म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८४०

# सरकारी उद्योगांचा भ्रष्ट घोटाळा

REFBK-0023082

विराट

मूल्य २ रुपये

# सरकारी उद्योगांचा ब्रह्मघोटाळा

शरद अनंत कुलकर्णी

REFBK-0023082

विराट प्रकाशन, मुंबई

सरकारी उद्योगांचा
ब्रह्मघोटाळा

विराट प्रकाशन
३

दीपावली
१९८०

प्रकाशक :
ब. ना. जोग
रा. द. पणशीकर
विराट प्रकाशन
३९६, स्वातंत्र्यवीर
सावरकर मार्ग,
प्रभादेवी,
मुंबई ४०० ०२५

मुखपृष्ठ :
बाळ ठाकूर

मुद्रक :
आयुर्विद्या मुद्रणालय
९९२ सदाशिव पेठ,
पुणे ३०

मूल्य २ रुपये

# निवेदन

**विराट** प्रकाशनाच्या पहिल्या संचातील ही पुस्तिका वाचकांच्या हाती देताना आम्हांला अतिशय आनंद होत आहे. या प्रकारच्या पुस्तिकांची कल्पना गेली दोन वर्षे आमच्या मनात घोळत होती. अनेक मित्रांना, लेखकांना, विचारवंतांना आणि सामाजिक कार्यकर्त्यांना ही कल्पना सांगितली. अनेकांनी ती उचलन धरली. कांहींनी मौलिक सूचना केल्या. लहान पुस्तकांतुन विविध विषयांवर माहिती देण्याचा उपक्रम नवीन नाही, मात्र या पुस्तिका मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध करून घरोघर पोचविण्याची कल्पना नवीन आहे.

समाजजीवन अधिकाधिक गुंतागुंतीचे होत आहे. अनेक घटनांचे परिणाम आपल्या नित्याच्या जीवनावर कळत न कळत होत आहेत. शिक्षित स्त्री-पुरुषांनी या घटना डोळसपणे समजावून घेऊन त्या घटनांना इष्ट ते वळण लावण्याचा प्रयत्न केला तर दिवसेंदिवस असह्य होणारे व्यक्तिगत व सामाजिक जीवन सुसह्य होईल.

या पुस्तिकेचे लेखक श्री. शरद अनंत कुलकर्णी हे मुंबई विद्यापीठाचे एम्. कॉम्. असून गेली अनेक वर्षे त्यांचा अर्थशास्त्रावर सखोल अभ्यास आहे. अनेक नियतकालिकांतून ते नियमितपणे विविध टोपण नावांनी अर्थशास्त्रावर लिहीत असतात. उद्योगधंद्याचा त्यांना स्वतःला अनेक वर्षांचा अनुभव आहे. सरकारी उद्योगधंदे हा त्यांच्या अभ्यासाचा खास विषय आहे.

—प्रकाशक

निबंध
२८४०
२३०८२
संदर्भ शाखा
१०।१२।८९

# गरिबांच्या श्रमाचे हे विश्वस्त !

आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राला आता महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. अर्थव्यवस्थेत असे एकही क्षेत्र नाही की ज्यामध्ये सार्वजनिक प्रकल्पाची स्थापना झालेली नाही. गेल्या काही वर्षांत या क्षेत्राचा भारतात खूपच विस्तार झाला असून अर्थव्यवस्थेला चालना देणारा एक महत्त्वाचा घटक असे स्थान या क्षेत्राने प्राप्त केलेले आहे. अगदी रोजच्या उपयोगातील पावबिस्किटांपासून तो कापडापर्यंत आणि घड्याळापासून तर रेल्वे वाघिणीपर्यंत अनेक प्रकारचे उत्पादन या क्षेत्रात करण्यात येत आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय अर्थव्यस्थेत सार्वजनिक क्षेत्राचा वाटा फारच थोडा होता. स्वातंत्र्यानंतर नियोजन मंडळाची स्थापना होऊन मिश्र अर्थव्यवस्थेचे तत्त्व मान्य करूनही सार्वजनिक क्षेत्राला अग्रक्रम देण्यात आला व या क्षेत्राचा सर्वांगीण कार्यक्षेत्रात प्रवेश झाला. प्रथम संरक्षण आणि मूलभूत व अवजड यंत्रसामुग्रीच्या उद्योगांत या क्षेत्राला सिंहाचा वाटा देण्यात आला व त्यानंतर लहान यंत्रसामुग्री निर्मितीपासून थेट रासायनिक खते, रसायने, औषधे, वीजनिर्मिती इत्यादीपर्यंत या क्षेत्राचा विकास करण्यात आला. आज देशात सार्वजनिक क्षेत्रात २०० च्या वर प्रकल्प असून या उद्योगांमध्ये जून १९८० अखेर भारतीय जनतेचे १५,६०२ कोटी रुपयांचे भांडवल गुंतविण्यात आलेले आहे. या सरकारी उद्योगांची आर्थिक उलाढाल १९७२-७३ मध्ये ५,५७१ कोटी रुपयांची होती तर १९७६-७७ मध्ये ती १४,५४२ कोटी रुपयांपर्यंत पोहचली होती. वरील दोन्ही वर्षांत या क्षेत्राचा रोजगार ९.३२ लाखांवरून १५.७५ लाखांवर पोचला तर खर्च ५८२ कोटी रुपयांवरून १५०३ कोटी रुपयांवर गेला. आज देशातील संघटित औद्योगिक कामगारांपैकी ६८ टक्के कर्मचारी सार्वजनिक क्षेत्रात काम करीत असून एकूण नक्त राष्ट्रीय उत्पादनापैकी ३० टक्के उत्पादन याच क्षेत्रात होत आहे. तथापि एवढ्या प्रचंड भांडवलावर या क्षेत्रांतील प्रकल्पांनी १९७८-७९ मध्ये ३२ कोटी रुपयांचा तोटाच दाखविला आहे ! प्रत्यक्षात हा तोटा याहूनही खूपच जास्त आहे परन्तु याबाबत सरकारचे अर्थखाते उदंड युक्त्या योजून तोटा नगण्य दाखविण्याचा प्रकार सर्रास करीत असते। या तारेवरच्या कसरती तपासणे खूपच उद्बोधक ठरेल.

## पांढऱ्या हत्तींची वाढती पैदास

अर्थखात्याची एक युक्ती अशी की ज्यांची उभारणी अजून पुरी झाली नाही अशा कारखान्यांत होणारे नुकसान जमेत धरायचे नाही. यामुळे नुकसान खूपच कमी दिसते हे खरे, कारण आपल्या सार्वजनिक क्षेत्राला एक एक कारखाना उभारायला पाच ते नऊ वर्षे सहजच लागतात ! या काळात कोट्यवधी रुपये यंत्रसामुग्रीत निरर्थक अडकून पडलेले असतात व शेकडो अधिकाऱ्यांचा पगार व भत्ते सुरू झालेले असतात. या पैशांवरचे नुसते व्याज जरी हिशोबात घेतले तरी खूप भुर्दंड पडतो. पण नफातोटा पत्रकात हे व्याज वगैरे धरण्यातच येत नाही !

दुसरी युक्ती म्हणजे सरकारने ज्या आजारी गिरण्या वगैरे ताब्यात घेतल्या आहेत त्यांच्यावर होणारा तोटा वेगळा काढायचा. कारण या उद्योगांचे आजारपण सरकारी क्षेत्र कसे काय दूर करणार ! आता हे आजारी उद्योग चालवावयास घेऊन जर नुकसान झाले तर तो काय सरकारचा दोष होऊ शकतो ? सरकारची अडचण इतकीच की सरकारने ताब्यात घेतलेले खाजगी उद्योग नंतर आजारी पडले तर काय करावयाचे ? कारण सार्वजनिक क्षेत्रात ज्या कोळशाच्या खाणी १९७२-७३ मध्ये आणल्या गेल्या त्या तत्पूर्वी खूपच नफा मिळवीत होत्या, पण त्यानंतर त्यांचा तोटाच वाढत वाढत १९७८-७९ मध्ये २१२ कोटी रुपयांवर गेला ! बोला आता कसे हिशोब मांडणार ?

ह्या सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्या नफ्यात चालतात हे दाखविण्याची आणखी एक युक्ती म्हणजे या कंपन्यांत गुंतविलेल्या भांडवलावर काय कमाई झाली ते दाखवावयाचे. ही कमाई अनेक बाबी वगळून दाखविली म्हणजे चित्र थोडेफार आकर्षक दिसू शकते. उदाहरणार्थ, व्याज, घसारा इत्यादी गोष्टींना फाटा द्यायचा ! एवढे करूनही हा नफा किती झाला म्हणता ? ही कमाई १९७८-७९ साली चांगली ७.६ टक्के झाली असे सरकारमान्य 'ब्यूरो ऑफ पब्लिक एन्टर्प्रायजेस' ने दाखविलेले आहे. यावर फक्त इतकेच म्हणता येईल की व्याजाचा दर जेथे आज कर्जावर १८ टक्के ठेवला गेला आहे तेथे ७-६ टक्के इतकी कमाई काय नफा समजता येईल ? यापेक्षा पोस्टात पैसे ठेवले असते तर १० टक्के व्याज मिळाले असते व कर्जाऊ रक्कम म्हणून खाजगी उद्योगांना पैसे दिले असते तर १८ टक्के व्याज आणि नफ्यांवर निदान ६५ टक्के आयकर, कंपनीकर मिळाले असते. शिवाय उत्पादनावर एक्साइज्, सेल्सटॅक्स म्हणून करोडो रुपये सरकारी तिजोरीत जमा होऊ

शकले असले. पण आपल्याला ' समाजवाद ' कळत नसल्यामुळेच असले अडाणी विचार आपल्या मनात येतात हे लक्षात घ्यायलाच हवे !

सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्यांनी नफा कमवावा म्हणून केवळ ही हिशोबांच्या मांडणीतली चतुराईच दाखविली जाते असे नाही तर इतरही चलाखीचे प्रकार केले जातात. एक म्हणजे या सार्वजनिक कंपन्यांना कमी दराने भांडवल मिळते. खाजगी कंपन्यांना दीर्घ मुदतीने भांडवल १३.५ टक्के दराने दिले जाते तर सार्वजनिक कंपन्यांना फक्त १० टक्के दराने. कधी कधी तर सरकार आपल्या कर्जाचे रूपांतर कंपन्यांच्या भाग भांडवलात (शेअर कॅपिटल) करून सार्वजनिक कंपन्यांना व्याजाच्या भुर्दंडातून वाचविते कारण भागभांडवलावर व्याज घेता येत नाही. म्हणजे रु. १० कोटींचे दीर्घ मुदतीचे कर्ज कंपनीला असले तर सार्वजनिक क्षेत्रीय कंपनीला दर वर्षी एक कोटी रुपये व्याजापोटी सरकारला द्यावे लागतील. आणि समजा, या व्याजाच्या हिशोबामुळे जर या कंपनीला ५० लाख रुपयांचा तोटा होत असेल तर सरकार या १० कोटींच्या कर्जाचे भागभांडवलात रूपांतर करेल व या सरकारी कंपनीचा एक कोटीचा भुर्दन्ड खाडकन थांबवेल. मग ही सार्वजनिक कंपनी चटकन ५० लाखांचा फायदा मिळवीत असल्याचे रमणीय चित्र दिसेल ! आहे की नाही खाशी युक्ती ! अशा प्रकारे सरकारने अनेक सार्वजनिक कंपन्यांना ' रमणीय ' बनविलेले आहे. परन्तु इतके केले तरी रामा शिवा गोविन्दा ! सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्या आपल्या नुकसानीतच चालतात ! याबाबतीत प्रसिद्ध अर्थतज्ञ प्रा. गंगाधर गाडगीळ विनोदाने लिहितात : " तेव्हा आता ही नफ्याची अपेक्षाच आपण सोडून द्यायला हवी. समाजवादात कसला आला आहे नफा ? इंद्राला कोणी विचारतं का की तू ऐरावत बाळगतोस त्यापासून तुला काही नफा होतो का म्हणून ? ऐरावत का कोणी नफा मिळविण्यासाठी बाळगतो ? तशाच या आमच्या सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्या म्हणजे समाजवादाचे ऐरावतच आहेत ! "

परन्तु हे समाजवादाचे पांढरे हत्ती गरीब भारतीय जनतेच्या जीवावर पोसले जात आहेत. साधनसामुग्रीची दुर्मिळता असलेल्या व भांडवलाची तीव्र टंचाई भासणाऱ्या भारतासारख्या अत्यंत गरीब देशाला ही गोष्ट हितावह ठरणार नाही.

**बेजबाबदारपणाचा कळस**

सार्वजनिक उद्योग प्रकल्पाच्या सुरुवातीपासूनच तोटा व अकार्यक्षमता यांचे दर्शन घडू लागते. त्वरित निर्णय न घेता तो रेंगाळत ठेवण्याने व ' लाल फितीत '

व नोकरशाहीत निर्णय-स्वातंत्र्य गहाण ठेवीत राहिल्याने किती आर्थिक नुकसान घडत रहाते हे पहाणे उद्‌बोधक ठरेल. ' हिंदुस्थान फोटो फिल्म्स् ' हा सरकारी उद्योगप्रकल्प काढण्यासाठी खूप रेंगाळते निर्णय घेत गेल्याने केन्द्र सरकारचे सुमारे ७ कोटी रुपयांचे नुकसान झाले. बोकारो पोलाद कारखाना उभारण्यास भारत सरकारला १५ वर्षे लागली. परिणामी उभारणीचे तसेच सामुग्रीचे खर्च वाढल्याने सरकारचे सुमारे २५० कोटी रुपयांचे नुकसान झाले. खत कारखाने, वीज निर्माण करण्याची केन्द्रे आपण ६ ते ८ वर्षे घालवून उभी करू शकत नाही, असा प्रत्यक्ष अनुभव सरकारने घेतला आहे. परिणामी कोटयवधी रुपयांचे नुकसान पदरात पडते. माजी उद्योगमंत्री श्री. टी. ए. पै यांनी याबाबत म्हटले होते " जपान पोलाद निर्मितीचा कारखाना तीन वर्षांत उभा करू शकतो, कोरियात तर अवघ्या दोन वर्षांत पोलाद कारखाना उभारला जातो भारतात मात्र यासाठी दहा ते पंधरा वर्षे लागतात. " आश्चर्य म्हणजे हेच प्रकल्प भारताच्या औद्योगिक सहकार्याने (Collaboration) इतर अविकसित देश अवघ्या दोन अडीच वर्षांत त्यांच्या देशांत उभे करू शकतात. ' भारत हेवी इलेक्ट्रिकल्स ' लिबियामध्ये अवघ्या तीन वर्षांत एक प्रचंड विद्युत् प्रकल्प उभा करू शकते, पण येथे मात्र हेच काम हीच कंपनी सात वर्षांतही करून दाखवू शकत नाही. या दीर्घसूत्री कारभारामुळे साधनसामुग्री अडकून पडते, उत्पादन उशीरा सुरू होते व तोटा वाढत जातो.

सार्वजनिक क्षेत्रातील अकार्यक्षम व बेजबाबदार नियोजन, अशास्त्रीय व्यवस्थापन यांमुळेही तोटे वाढत जातात; जी उद्दिष्टे डोळयांसमोर ठेवून प्रकल्प उभारले जातात तीही मागे पडतात. वानगीदाखल काही उदाहरणे पाहू.

१९७२ साली खाजगी कोळशांच्या खाणीचे पूर्णपणे राष्ट्रीयीकरण करण्यात येऊन ' कोल इन्डिया लि. ' या सार्वजनिक कंपनीची स्थापना करण्यात आली. या कंपनीने आर्थिक व्यवस्थापनात अद्‌भुत चमत्कार करून दाखविले ! कारभार हातात घेताच कामगार संख्येत एकदम ९० हजारांची सर्रास भरती केली व त्या कामगारांना कायम स्वरूपाच्या नोकऱ्या बहाल केल्या. ह्या भरमसाठ भरतीत प्रचंड भ्रष्टाचार करण्यात आला. १९७३ ते १९७६ या दरम्यान प्रतिवर्षी नवे २० हजार कामगार भरती करण्यात आले. भरपूर भ्रष्टाचारानंतर केन्द्र सरकारने हस्तक्षेप करून हे भरती प्रकरण एकदांचे आवरते घेतले, नाहीतर सारा बिहार कदाचित कोल इन्डिया मध्ये दाखल झाला असता ! बरे, एवढे सगळे कामगार कामावर असतात

काय ? तेही नाही. यांपैकी ३० ते ४० टक्के कामगार नेहमीच बुट्टया मारीत असतात. पगार मात्र संपूर्ण घेत रहातात. पण कोल इन्डिया लि. ही संस्था फार कनवाळू आहे. 'नाही ना यायचे कामावर, तर नका येऊ. आम्ही कंत्राटी कामगार कामावर घेऊ व काम करून घेऊ, असे ही संस्था म्हणते. नंतर हे कंत्राटी कामगार गडबड करतात व पक्की सरकारी नोकरी मागतात. संप घडवतात. शेवटी त्यांपैकी काहींना पक्क्या नोकरीत सामावून घेतले जाते. पण कामगारांना शिस्त लावण्याचा खाजगी भांडवलदारांचा दुष्टपणा ही कनवाळू व ममताळू सरकारी कंपनी कधीच करीत नाही. आहे की नाही समाजवादी खाक्या ! या सगळ्या भानगडीत उत्पादन बेटे मागेच रहाते. १९७६-७७ पर्यंत ते थोडेफार वाढते रहात होते. कारण जुन्या दुष्ट भांडवलदारी सवयी लवकर मोडीत निघत नव्हत्या. पण त्यानंतर नव्या समाजवादी सवयी पक्क्या झाल्या आणि उत्पादनाने जी बसकण मारली ती आजतागायत. म्हणजे उत्पादन १० कोटी टनांच्याच आसपास रेंगाळत आहे व प्रतिकामगारी उत्पादन कमी कमी होत आहे. राष्ट्रीयीकरणाचे उत्पादनवाढ हे उद्दिष्ट पार रसातळाला जाऊन पोहचले आहे !

पण एवढ्याने भागेल तर ती कोल इन्डिया कसली ! तिने याहूनही चमत्कार दाखविले कंपनीने १९७८-७९ पर्यंत ९२४ कोटी रुपयांचा नवा भांडवली खर्च केला. त्यातील ७५ टक्के पैसा जमिनीखालच्या खाणीवर खर्च झाला, पण ही यंत्रसामुग्री बेटी फारच आळशी व मंद निघाली असावी. कारण इतका भांडवली खर्च केल्यावरही जमिनीखालच्या खाणीतले उत्पादन ६.५ कोटी टनांवरून १९७८-७९ साली ६.१ कोटी टनांवर घसरले ! ही करामत घडून येण्यास अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या. पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे बरीच यंत्रसामुग्री गंजून पडून राहिली व तिचा उत्पादनवाढीसाठी उपयोगच करून घेतला नाही. तसेच जी सावधानता दाखवून उत्पादनवाढ करावयास हवी तिचा तर कोठे मागमूसही कोल इन्डियामध्ये दिसला नाही. कोळसा काढताना मोठ्या आगी लागत असतात व त्या त्वरित विझवावयाच्या असतात. तथापि ही महत्वाची बाब, कोल इन्डियाचे एअरकूल, पंचतारांकित गेस्ट हाऊसेस्‌मध्ये बसून कारभार करणारे संचालक विसरूनच गेले. 'झारिया' कोळसा खाणीत पुष्कळशा आगी अजून तशाच पेटत्या अवस्थेत आहेत. परिणामी ८.४ कोटी टनांचा उच्च दर्जाचा कोकिंग कोल जळून गेला ! या करामतीत दुसरा एक सार्वजनिक प्रकल्प सहभागी आहेच. तो म्हणजे विद्युत्‌निर्मितीचा. या उद्योगाने

कोळसा उत्पादनासाठी पुरेशी वीज पुरवली नाही. का म्हणून विचाराल, तर त्याचे उत्तर सोपे आहे. या वीजनिर्मितीसाठी लागणारा कोळसा कोल इन्डिया कंपनीने पुरविलाच नाही. म्हणजे कोळसा नाही म्हणून वीज नाही व वीज नाही म्हणून कोळसा नाही ! आधी अंडे की आधी कोंबडी अशी ही चक्रावून टाकणारी समस्या आहे !

१९७३ ते १९७८ या पाच वर्षांत कोल इन्डिया लि. ला. सुमारे ४७२ कोटी रुपयांचा तोटा झाला म्हणजे या तोटयाच्या रकमेत देशात ९० साखर कारखाने किंवा २५ सिमेंट बनविणारे नवे कारखाने उभे करता आले असते. बरे या राष्ट्रीयीकरणामुळे जनतेला अगर उद्योगधंद्यांना स्वस्त कोळसा मिळाला का ? ते तर सरकारी प्रकल्पांना कधीच जमले नाही. स्वस्ताई ही चीजच गायब आहे ! राष्ट्रीयीकरणाच्या वेळी कोळशाची किंमत टनामागे ३८॥ रुपये होती ती सध्या टनामागे १०२ रुपये आहे. एवढी किंमतवाढ मिळूनही ‘ कोल इन्डिया ’ कंपनीचा प्रचंड तोटा चालूच आहे. या कंपनीने अनेक रेकॉर्ड-ब्रेक केले. वानगीदाखल एक नमुना पाहून हे विवेचन संपवू. कोळशाच्या चोऱ्या या कंपनीने कारभार हातात घेतल्यावर खूपच वाढल्या. नुकतेच बिहारमध्ये एका जिल्हयात आढळून आले की कंपनीमधून कोळसा घेऊन जाणाऱ्या ३९५ लॉऱ्यांपैकी फक्त २६५ लॉऱ्यांनी माल योग्य ठिकाणी नेऊन पोहचवला. १३० ट्रक मालासकट गायब आहेत. म्हणजे ट्रक फिरत आहेत पण पोलिस रिपोर्टस् व कंपनी रेकॉर्डस्मध्ये हे ट्रक्स् गायब आहेत !

दारिद्र रेषेखाली जगणाऱ्या, भीषण गरिबीत होरपळून निघणाऱ्या कोटयवधी भारतीयांच्या श्रमाच्या, घामाच्या भांडवलाचे हे विश्वस्त किती मनमानी कारभार करीत आहेत ! तसेच कोळशाच्या उत्पादनाची प्रत खूपच बिघडून जनतेला हैराण करीत आहेत. परिणामी कोल इन्डियाची उद्योगपती, रेल्वे बोर्डाचे संचालक व सामान्य गरीब गिऱ्हाईके यांनी पुरती भीतीच घेतलेली आहे.

# राजकीय हस्तक्षेप व भ्रष्टाचार

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांतील नफ्याची घसरण व वाढते तोटे निश्चितच राष्ट्राच्या दृष्टीने हितावह नाहीत. खऱ्या अर्थाने केवळ ३७ सरकारी कारखाने १९७७-७८ सालात फायद्यात होते व बाकीचे कारखाने फार मोठे तोटे दाखवीत होते. त्या वर्षी पुढील महत्त्वाचे कारखाने तोट्यात होते (१) हिन्दुस्थान कॉपर ३१.११ कोटी रुपये तोटा (२) हेवी इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन ३०.२६ कोटी रुपये तोटा, (३) फर्टिलायझर कॉर्पोरेशन ६७ कोटी रुपये तोटा, (४) कोल इन्डिया ९० कोटी रुपये तोटा, (५) ईस्टर्न कोल फिल्ड्स् ४२ कोटी रुपये तोटा (६) सरकारी कापड गिरण्या २८.५० कोटी रुपये तोटा इ. अशा प्रकारे सातत्याने तोटे वाढत आहेत व नफे कमी होत आहेत. पोलाद उद्योगामध्ये १९७६-७७ साली असणारे नफ्याचे प्रमाण ६६.५० कोटी रुपये होते तर हेच नफ्याचे प्रमाण १९७७-७८ साली ८.३० कोटी रुपयांपर्यंत खाली घसरलेले आढळते. नफ्याची घसरण न होता नफ्याचे प्रमाण वाढते राहिले ते फक्त पेट्रोलियम उद्योगांतच. य पार्श्वभूमीवर खाजगी क्षेत्रातील बड्या १०१ कंपन्यांचे उदाहरण पडताळून पहात येईल. या खाजगी कंपन्यांना १९७७-७८ साली नक्त नफा १८८.४ कोटी रुपये झाला तर १९७८-७९ साली या कंपन्यांनी २६९.५ रुपये नक्त नफा कमविला. यांची भांडवल गुंतवणूक, तसेच त्यांना मिळणाऱ्या सवलती व किंमतीवाढ या सार्वजनिक क्षेत्रांतील उद्योगांच्या तुलनेने नगण्य असतानाही त्या कंपन्यांनी नक्त नफा, कार्यक्षमता, उत्पादनवाढ व चोख कारभार यांबाबत, तसेच संशोधन आणि शास्त्रीय विकास यांबाबतही खूपच मोठी आघाडी मारलेली दिसते. खाजगी कंपन्यांचा हा नफा प्रत्यक्षात खूपच अधिक आहे कारण प्रचंड कर-आकारणीच्या सरकारी कायद्यांमुळे अनेक खाजगी कारखाने आपली आर्थिक उलाढाल उबलक मार्गाने म्हणजे नंबर दोनमध्ये करतात हे उघड गुपित आहे ! राजकीय हस्तक्षेपामुळे सार्वजनिक प्रकल्पांचे खूपच नुकसान होत असते. संचालकांच्या वारंवार बदल्या ह्या राजकीय लाभाच्या दृष्टिकोनातून केल्या जातात. परिणामी संचालकांना प्रकल्पावर पकड घेता येत नाही व सतत दिल्लीच्या वाऱ्या करून राजकीय नेत्यांची मर्जी सांभाळावी लागते. तसेच राजकारणी लोकांचे भ्रष्टाचार खपवून घेण्यासाठी त्यांच्याशी संगनमत

करून प्रकल्पाचे संचालक व अधिकारी वर्ग राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा बळी देतात हेही अनेक प्रसंगी ठळकपणे दिसून आलेले आहे. वानगीदाखल काही उदाहरणे पाहू.

दूरदृष्टीच्या डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी ह्यांनी केन्द्रीय उद्योगमंत्री असताना १९५१ साली सिन्द्रीचा खत कारखाना अत्यंत परिश्रमाने उभा केला. पुढील काळाचा मागोवा घेणाऱ्या डॉ. मुखर्जींनी भारतात मुबलक उपलब्ध असणाऱ्या 'कोळसा' हे इंधन वापरण्याच्या तंत्रावर या सिन्द्रीच्या खत कारखान्याची उभारणी केली. कारण तेल व पेट्रोकेमिकल्स् यांचे इंधन वापरल्यास अरब देशांच्या मर्जीवर भारताचे उद्योगीकरण व शेती अवलंबून राहील हे श्यामाप्रसादांनी चाणाक्ष दृष्टीने ओळखले होते. पण डॉ. मुखर्जी केन्द्रीय मंत्रिमंडळातून राजीनामा देऊन बाहेर पडले व हा दृष्टिकोन सांभाळला गेला नाही. पेट्रोडॉलर्सचे चालक, पाश्चिमात्य उद्योगपती आणि अरब शेख ह्यांनी तत्कालीन काँग्रेसी धुरीणांना भ्रष्टाचारी मार्गाने अंकित करून घेतले व भारतात 'इंधन' म्हणून तेलाचा व पेट्रोकेमिकल्सचा वापर करण्याच्या तंत्राचा वापर करणारे खतकारखाने काढण्यावर भारत सरकारला भरीस घातले. असे म्हणतात की ह्यात लक्षावधी रुपयांचा मलिदा चारण्यात आला व भारतीय राजकीय धुरीण व सरकारी अधिकारी या डावास मोहाने बळी पडले. परिणामी देशाची अर्थव्यवस्था अरबी तेलाच्या भरवशावर अवलंबून राहिली! त्यावेळी मध्यपूर्वेतील अरब राष्ट्रे तेलाच्या किंमती भरमसाट वाढवून भीषण तेलसंकट भारतासकट सर्व जगापुढे उभे करतील अशी कल्पनाही भारतीय राजकीय व औद्योगिक नेत्यांनी केलेली नव्हती. दूरदृष्टीवर भ्रष्टाचाराने मात केली.

## राजकारणाचे बळी

त्याच काळात राजकीय हस्तक्षेप करून सरकारने नवे खत कारखाने अरबी तेलावर अवलंबून ठेवले व विज्ञान व संशोधन ह्यांचा या हस्तक्षेपापायी बळी गेला. तेलाच्या भरमसाट भावामुळे खत कारखाने प्रचंड तोटयात गेले. विज्ञान व संशोधनाचा बळी गेला हे म्हणण्याचे कारण म्हणजे त्या विशिष्ट काळात सिन्द्री खत कारखान्याचे डॉ. श्यामप्रसाद मुखर्जींनी नियुक्त केलेले महान् तज्ज्ञ डॉ. चक्रवर्ती हे प्रमुख होते. डॉ. चक्रवर्ती ह्यांनी कोळशावर संस्कार करून खतांच्या निर्मितीसाठी, रसायने बनविण्यासाठी व तेलाच्या उत्पादनासाठी त्याचा उपयोग करण्याचे नवे तंत्र अत्यंत मेहनतीने विकसित केले

होते. परन्तु राजकीय हस्तक्षेप व भ्रष्टाचार यांमुळे 'अरबांच्या तेलाचा उपयोग करून रासायनिक खतांचे कारखाने भारतात उभारले जावेत' या मागणीचा जोर इतका वाढला की डॉ. चक्रवर्तींचे नवे शास्त्रीय संशोधन व तंत्र धिक्कारले गेले. त्यानंतर चक्रवर्तींना सिन्द्री खत कारखाना सोडून जावे लागले. याचा परिणाम म्हणजे तेलसंकटामुळे भारताचे खत कारखाने महागडे पडू लागले आहेत, त्याचे उत्पादनखर्च वाढते आहेत. आर्थिक तोटे प्रचंड आहेत, तसेच इंधनासाठी सरकारला अरबी राष्ट्रांपुढे हात पसरावे लागत आहेत !

राजकीय भ्रष्टाचार व हस्तक्षेप यांतून संरक्षण प्रकल्पही सुटलेले नाहीत. देशाचे संरक्षण प्रकल्प हे अत्यंत महत्त्वाचे लष्करी घटक आहेत. लष्कराला लागणारी अद्ययावत यंत्रसामुग्री यांतून बनविली जाते. परन्तु श्री. कृष्ण मेनन हे संरक्षणमंत्री असताना या प्रकल्पांतून रणगाडे बनविण्याऐवजी ट्रकच्या लाकडी चेसीस् आणि कॉफी बनविणारी प्रक्रिया इत्यादी फालतू गोष्टींची जबाबदारी मेनन महाशयांनी या प्रकल्पांवर टाकली होती. परिणामी चिनी आक्रमणापुढे भारताला मानहानी पत्करावी लागली. त्यानंतरही या प्रकल्पांना खाजगी क्षेत्राचे सहाय्य घेऊन देशाचे संरक्षण मजबूत करण्याचे प्रयत्न राजकीय हस्तक्षेपापायी उधळून लावण्यात आले. वालचंद उद्योगसमूह आणि किर्लोस्कर उद्योगसमूह यांनी चीनच्या आक्रमणानंतर भारत सरकारला अनेकदा संरक्षण-सामुग्री बनवू देण्याबद्दल व संरक्षण-प्रकल्प अधिक विकसित करू देण्याबद्दल विनविले होते. परन्तु या उद्योगांच्या संचालकांची निर्भीड व स्पष्ट मते कोत्या बुद्धीच्या तत्कालीन काँग्रेसी धुरीणांना रुचली नाहीत व या शास्त्रीय मागण्या डावलण्यात आल्या !

हे चित्र १९८० मध्येही बदलले नाही असे दिसते. ब्रिटिश बनावटीचे सेंचुरिअन रणगाडे एके काळी भारताची शान होती व ते पाकिस्तानला १९६५ च्य-आक्रमणाच्या वेळी कर्दन काळ ठरले होते. ब्रिटिश बनावटीचे हे सेंचुरिअन रणगाडे आता जुनाट व निरुपयोगी झाल्याची हवा निर्माण करून त्यांच्या सुट्या भागांची विक्री परदेशात सुरू झाल्याचे सर्वश्रुतच आहे. इंदिरा राजवटीने ह्या विक्रीस परवानगी तर दिली आहेच परन्तु लष्करी तज्ज्ञांची मते डावलून हे सारे सौदे पार पाडले जात आहेत. या सौदेबाजीत या रणगाड्यांच्या सुमारे ७ कोटी रुपयांच्या सुट्या भागांची विक्री अवघ्या ७० लाख रुपयांत करण्यात आल्याचे सांगितले जाते व ह्यास विरोध करणाऱ्या मेजर जनरच्या हुद्दयावरील अधिकाऱ्याची तातडीने

बदली करण्यात आली असून या व्यवहाराला ऑर्डनन्स सर्व्हिसेसचे डेप्युटी डायरेक्टर श्री. मोहोनी यांनी केलेला प्रखर विरोध डावलून टाकण्यात आला आहे !

### संरक्षणातही सौदेबाजी

या रणगाड्यांची पेट्रोलवर चालणारी इंजिने बदलून व गिअरबॉक्स वेगळी करून प्रसिद्ध विजयंता रणगाड्यांवर असणाऱ्या देशी बनावटीच्या तोफा त्यावर बसविल्या तर हे सेंचुरिअन रणगाडे पुन्हा कार्यक्षमतेने वापरात येऊ शकतात. शिवाय अनेक नवे रणगाडे उभे राहू शकतात असे लष्करी तज्ज्ञांचे मत आहे. हे काम दिल्लीच्या लष्करी यंत्रशाळेला सहजपणे करता येईल असेही या तज्ज्ञांचे म्हणणे आहे. परन्तु ते न करता या यंत्रशाळेला प्रवासी मोटरगाड्यांची दुरुस्ती व ट्रक्सच्या चेसीस बनविण्याची फालतू कामे देण्यात आलेली आहेत. जाणकारांचा सल्ला धुडकावून करोडो रुपयांची हानी करणारी सौदेबाजी चालू असल्याचे वृत्त आहे व संरक्षणासारख्या विषयाशी जीवघेणे खेळ चालू असल्याचे म्हटले जाते ! ब्रिटनच्या गार्डीयन या वृत्तपत्राने असे स्पष्टपणे म्हटले आहे की ही विक्रीची सौदेबाजी कै. संजय गांधी यांच्या मार्गदर्शनाखालीच सुरू होती !

राजकीय भ्रष्टाचारामुळेही सार्वजनिक प्रकल्पांची खूपच हानी तसेच बदनामी होत रहाते. सध्या सर्वदूर कोळशाची टंचाई जाणवत आहे. त्यामुळे केन्द्र सरकारने कोळशाच्या किमतीवर नियंत्रणे घालून परमिट-लायसन्स-कोटा ही पद्धती सुरू केली. परन्तु कुंपणानेच शेत खाऊन टाकले. ऊर्जा व कोळसा मंत्री श्री. घनीखान चौधरी यांनी स्वतःच १ कोटी रुपयांची कोळसा-विनिमयाची परमिटे प्रसृत केली. त्याबद्दल लोकसभेत जी माहिती ७ ऑगस्ट १९८० रोजी बाहेर आली ती अशी : श्री. घनीखानसाहेबांनी स्वतःच्या माल्डा या पश्चिम बंगालमधील मतदारसंघातच १३४ पैकी ११९ परमिटे दिलेली आढळली. माल्डामध्ये कोळशाची गरजच पडत नाही पण ही परमिटे तेथेच वाटली गेली. यामध्ये भयानक भ्रष्टाचार घडला, कारण काळ्या बाजारात हा कोळसा चौपट भावाने विकला गेल्याचे समजून आले. य परमिट लायसेन्सबद्दल कम्युनिस्ट खासदार श्री. ज्योतिर्मय बसू यांनी लोकसभेत माहिती सांगितली ती पहाता हे इंदिरा काँग्रेसी मंत्री किती बिनादिक्कतपणे राजकीय भ्रष्टाचाराचा मार्ग अवलंबितात व तद्वारा सार्वजनिक क्षेत्राचा तोटा व देशाचे केवढे नुकसान करतात ते कळून येते. खा. बसू म्हणतात : " Most of the

allottees whom Ghani saheb favoured were just not traceable ! Many allotees were bogus and the transactions were downright Benami !! " केन्द्रीय मंत्र्यांच्या वरिष्ठ पातळीवर सार्वजनिक कंपन्यांच्या उत्पादित वस्तूंबाबत हे प्रकार दडपून चालत असतील तर गरीब जनतेच्या कल्याणाचे नावच नको ! घनीखान चौधरींनी कोळशाचे तर एक परमिट मास्टर असीफ नावाच्या एका एवढ्या लहान वयाच्या मुलाला दिलेले आढळले की त्यास कोळसा, कोकोकोला अगर कॉफी-कोको यांमधील फरकही कळू शकला नसता !

**वारेमाप उधळपट्टी**

आर्थिक शिस्त बाणवून घेऊन तसेच शास्त्रीय नियोजन अंगिकारून आपले तोटे कमी करण्याचे साधे प्रयत्नही हे सार्वजनिक क्षेत्रांतील प्रकल्प करताना दिसत नाही. आपण गरीब देशातील, दारिद्र्याने गांजलेल्या श्रमिक जनतेचे विश्वस्त आहोत अशी सामाजिक जबाबदारीची जाणीव नसल्याने ह्या कारखान्याचे चालक, अधिकारी व कामगार वारेमाप खर्च करून मनमानी कारभार करताना दिसतात.

वास्तविक पहाता केन्द्र सरकारच्या अखत्यारीतील या उपक्रमांच्या कारभारावर लोकसभेचे नियंत्रण असते. या सार्वजनिक कंपन्यांच्या कारभाराची पाहणी करण्याकरिता संसदेमार्फत एक समिती नियुक्त करण्यात येते. १९७७ मध्ये जनता पक्षाचे सरकार आल्यावर त्याने अत्यंत कुशाग्र व अभ्यासु असलेले खासदार ज्योतिर्मय बसू यांच्या अध्यक्षतेखाली अशी समिती नेमून या सरकारी उद्योगांची पहाणी केली. खा. बसू हे कम्युनिस्ट पक्षाचे खासदार असून सार्वजनिक क्षेत्राची नेहमीच तात्त्विक दृष्टीने तरफदारी करणारे आहेत. परन्तु खा. बसूंचे स्वतःचे डोळे या पहाणीत खाडकन उघडले व त्यांच्या अभ्यासपूर्ण अहवालांनी अनेकांच्या डोळ्यांसमोर काजवेच चमकले ! बसू कमिटीने १७२ सार्वजनिक उद्योग-प्रकल्पांकडून माहिती मागविली होती. ७२ उपक्रमांनी या सर्वोच्च सरकारी समितीला उत्तरेच पाठविली नाहीत व पाहणीही करू दिली नाही. वारे संसदीय नियंत्रण ! पण खा. बसूंनी १०० उपक्रमांचे जे अहवाल संसदेला सादर केले तेही खूपच बोलके आहेत !

वर्षानुवर्षे सातत्याने प्रचंड तोटे दाखविणाऱ्या या सार्वजनिक क्षेत्रांतील १०० प्रकल्पांनी मार्च १९७७ ला संपलेल्या तीन वर्षांत आपल्या कचेऱ्या सजवण्यावर व 'एअरकूल' करण्यावर केवळ ४२ इमारतींसाठी ३॥ कोटी रुपये खर्ची पाडले. यांपैकी काही कारखान्यांचा हा सजावटीचा खर्च १५२ रुपये चौरस फूट म्हणजे सर्वसाधारण नागरी बांधकामाच्या दराच्या दुप्पट पडतो! म्हणजे सजावट बांधकामापेक्षा दुप्पटीने महाग पडली! यातही लक्षावधी रुपयांच्या भ्रष्टाचाराची प्रकरणे दडलेली आहेत असे दिसून आले. अनेक कारखाने भाड्यावर अमाप खर्च करताना दिसले. एका सरकारी कारखान्याने तर केवळ भाड्या-पोटी एकाच वर्षात सुमारे ५२ लाख रुपये खर्च केले. यातहि अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांचीच घरे भाड्याने घेतलेली जास्त प्रमाणात आढळली. तसेच अनेक तत्कालीन राजकीय पुढाऱ्यांचे प्लॉटस् व घरे अशा प्रकारे भाड्याने दिलेली दिसली. भाड्यापोटी जे कोटयवधी रुपये खर्ची पडले त्यातून सरकारला कायम स्वरूपाच्या स्वतःच्या इमारती कार्यालयासाठी बांधता आल्या असत्या असे बसू समितीने म्हटलेले आहे.

अनेक सार्वजनिक उपक्रमांनी विश्रामगृहांसाठी व अतिथिगृहांसाठी लाखो रुपयांचा अनुत्पादक खर्च केलेला बसू कमिटीला दिसून आला. १९७४-७५ मध्ये सार्वजनिक कारखान्यांची विश्राम व अतिथिगृहांची संख्या ९३ होती ती १९७६-७७ मध्ये २३३ पर्यंत पोहचली. ह्यापैकी ६६ विश्रामगृहे केवळ ७ उपक्रमांची होती. आयुर्विमा महामंडळाची ५० अतिथिगृहे आहेत ती वेगळीच. यांतील अनेक गृहे पंचतारांकित बड्या हॉटेलांच्या तोडीची असल्याचे आढळून आले आहे. सार्वजनिक प्रकल्पांची मुख्य कार्यालये साधारणपणे शहरांत व त्यातही नवी दिल्लीत जास्त आहेत. यांपैकी काही इमारती प्रासादतुल्य असून तेथे अत्याधुनिक सुखसोयी केलेल्या आहेत. सालोसाल सुखसोई गरीब जनतेच्या घामाच्या पैशांतून सतत वाढत्या ठेवलेल्या आढळल्या. १९७६-७७ मध्ये म्हणजे ऐन आणीबाणीच्या काळात २५ औद्योगिक सरकारी महामंडळांनी मुख्य कार्यालयाच्या इमारती वातानुकूलित करण्यासाठी २१ लाख रुपये खर्च केले. आणीबाणीत हे प्रकल्प राजकारणी नेत्यांच्या सत्कारांवर खूपच खर्च करीत असल्याचे आढळून आले आहे!

विश्रामगृहे बांधण्याचा उद्देश असा की लॉजिंगचे खर्च कमी व्हावेत व तत्सम बचत व्हावी. पण झाले आहे ते नेमके उलटे! विश्रामगृहांच्या सजावटीकरिता व तेथील

सुखसोयीकरिता केलेला खर्च हा प्रत्यक्ष बांधकामावर केलेल्या खर्चाच्या तुलनेत खूपच जास्त वाटतो. उदा. ( १ ) नॅशनल फर्टिलायझर कॉर्पोरेशनने पानिपत येथे ९० हजार रुपये खर्च करून विश्रामगृह बांधले आणि त्याच्या सजावटीवर ८८ हजार रुपये खर्ची घातले. (२) भारत ॲल्युमिनियम लि. ने विश्रामगृहाच्या बांधकामासाठी ९० हजार रुपये खर्च केले तर त्याच्या सजावटीवर ५७ हजार रुपये खर्ची पाडले ! (३) वेस्टर्न कोल फील्डस् लि. ने प्रत्येकी ५० हजार रुपयांच्या १३ इमारती विश्राम स अतिथी गृहांसाठी बांधल्या. तेथील पडदे, सजावट, एअर कंडिशनिंग इत्यादींवर प्रत्येक इमारतीवर ४० हजार रुपयांचा खर्च केला.

हे अफाट अनावश्यक व अनुत्पादक खर्च चालू असताना वरील तीनही कंपन्या अफाट आर्थिक तोटे सहन करीत होत्या व केन्द्र सरकारकडून लाखो रुपयांचे नवे कर्ज उचलीत होत्या.

सार्वजनिक क्षेत्रांतील ' आदर्श ' म्हणून गौरवलेला व सतत नफा दाखविणारा ' हिन्दुस्थान मशीन टूल्स ' हा कारखाना समूहदेखील उधळपट्टीत पुढे सरकू लागला आहे अशी नवी माहिती नुकतीच उजेडात आली आहे. या एच्. एम्. टी. कारखान्याने कलमसरी येथे नुकतेच एक कार्यालय बांधले. त्यावर बांधकाम, अंतर्गत सजावट, वातानुकूल सामुग्री यांसाठी ७५ लाख रुपये खर्च केले !

आणखी एक याबाबत विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे ऐन ' आणीबाणी'च्या काळातच अनेक सरकारी उपक्रमांच्या आदरातिथ्यावरील खर्चात वाढ झाली. त्यांनी कोणाचे व कशासाठी आदरातिथ्य केले हा संशोधनाचा विषय होईल !

# उधळपट्टीची ‘ जाहिरात ’

सार्वजनिक क्षेत्रीय कंपन्यांचा जाहिरात व प्रसिद्धी यांवरही अमाप पैसा भ्रष्टाचारी मार्गाने खर्ची पडला असल्याचे खा. बसूंच्या समितीला आढळून आलेले आहे. मालाच्या खपासाठी आणि व्यापारवृद्धीसाठी हल्लीच्या स्पर्धेच्या काळात मालाची जाहिरात करणे आवश्यक ठरते. परन्तु अनेक सार्वजनिक उपक्रमाची विशिष्ट क्षेत्रात मक्तेदारी आहे तर काही उपक्रम असे आहेत की त्यांना असलेली मागणी पूर्ण करणे शक्य नाही. अशा स्थितीत या प्रकल्पांना जाहिरातीवर विशेष खर्च करण्याची गरज भासू नये. तरीही अनेक सार्वजनिक उपक्रमांनी मालाच्या व इतर प्रकारच्या प्रसिद्धीवर लाखो रुपये खर्च केले. १९७४ ते १९७७ या दरम्यान सरकारी उपक्रमांचा केवळ जाहिरातींवरील खर्च १० कोटी रुपये झाला.

सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांना प्रसंगविशेषी जाहिरात करण्याची आवश्यकता भासली तर केन्द्र सरकारच्या माहिती नभोवाणी मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली ‘ डायरेक्टोरेट ऑफ अॅड्व्हर्टायझिंग अॅन्ड व्हिज्युअल पब्लिसिटी ’ ( डी. ए. व्ही. पी. ) ह्या यंत्रणेमार्फत करावी अशी सरकारची सूचना आहे. परन्तु वरील सूचनेचा भंग करून अनेक उपक्रमांनी परस्पर जाहिरात केल्याचे बसू समितीला आढळले. जाहिरात खर्चापैकी केवळ दीड टक्का रक्कम डी. ए. व्ही. पी. मार्फत केलेल्या जाहिरातीवर खर्च करण्यात आली.

यासंबंधी एक उल्लेखनीय गोष्ट अशी की, खाजगी क्षेत्रांतील उद्योगांमध्ये सर्वमान्य ठरलेल्या आकाशवाणी व दूरदर्शन ह्या प्रसिद्धीच्या प्रभावी सरकारी माध्यमांची निवड न करता सार्वजनिक कंपन्यांनी खाजगी जाहिरात कंपन्यांची निवड केली. त्यामुळे जाहिरातीचा मलिदा या मूठभर पण राजाश्रयाच्या भरंवशावर चाललेल्या खाजगी जाहिरात कंपन्यांनाच मिळाला आणि ‘ वरची उचल ’ या नावाखाली सार्वजनिक क्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना भरपूर कमिशनची लाच याच खाजगी जाहिरात कंपन्यांनी दिली ! बसू समितीने नमूद केल्याप्रमाणे १९७४ ते १९७७ या कालात खाजगी जाहिरात कंपन्यांना सार्वजनिक उपक्रमांकडून कमिशनच्या रूपाने ७.९३ कोटी रुपयांची रक्कम मिळाली. ह्यातील काही लाख रुपये भ्रष्टाचारी मार्गाने सार्वजनिक उपक्रमांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या

खिशांत गेले असावेत असा निष्कर्ष बसू समितीने काढला आहे. आकाशवाणी व दूरदर्शन यांच्यामार्फत जाहिरात न करण्याचे ह्या प्रकल्पांचे महत्त्वाचे कारण म्हणजे ह्या सरकारी यंत्रणा असल्याने हे लाखो रुपयांचे लाच-प्रकरण निभावून नेणे कठीण गेले असते हेच होय असे खा. बसूंनी म्हटले आहे !

तशीच उल्लेखनीय बाब म्हणजे प्रसिद्धी व जाहिरात यांवर सर्वांत जास्त खर्च आयुर्विमा महामंडळाने केला. आयुर्विमाच्या व्यवसायात संपूर्ण एकाधिकार असताना महामंडळाने जाहिरातीकरिता एवढा प्रचंड खर्च करावा याचे नवल वाटते व कोठे तरी पाणी मुरत आहे ही शंका वाटू लागते ! आयुर्विमा महामंडळानंतर इंडियन एअरलाईन्स्, भारत हेवी इलेक्ट्रिकल्स्, हिन्दुस्थान मशीन टूल्स, हिन्दुस्थान फोटो फिल्म्स्, इलेक्ट्रॉनिक्स् कार्पोरेशन ऑफ इन्डिया आणि गार्डन रीच् शिपबिल्डर्स ॲन्ड इंजिनिअर्स लि. यांचा क्रमांक लागतो. १९७६–७७ मध्ये वरील सर्व उपक्रमांनी प्रसिद्धी व जाहिरातीवर सुमारे २·४५ कोटी रुपये खर्च केला. यांतील पुष्कळ खर्च अनावश्यकच होता ! संबंधित उपक्रमांनी याबाबत केलेले व्यवहार सरळ व स्वच्छ नाहीत असेच कोणीही म्हणू शकेल.

बरं, ही सर्व जाहिरातबाजी इतक्या फडतूस गोष्टींसाठी खर्ची पडते की त्याचे नवलच वाटू लागते. इंडियन एअर लाईन्स ह्या सार्वजनिक कंपनीला देशांतर्गत विमान वाहतुकीची पूर्ण मक्तेदारी सरकारने दिलेली आहे. तसेच ह्या विमान वाहतुकीला साधारणतः वर्षभर भरपूर प्रवासी असतात. तिकिटे मिळणेही ऐन वेळी कठीण असते. आता या इंडियन एअरलाईन्सला जाहिरातीची काय गरज ? तसेच ही कंपनी जाहिरात तरी कशाबद्दल करू शकणार ? पण हे प्रश्न समाजवादाची गंगोत्री उमजू न शकणाऱ्यांचे आहेत ! आता या एअरलाईन्सने १९७६–७७ मध्ये तब्बल २०·७३ लक्ष रुपये केवळ जाहिरातीवर खर्च केले. आता जाहिरातींचा मजकूर काय होता म्हणून विचाराल तर चकित होण्याची पाळी तुमच्याआमच्यावर यावयाची. हे सुमारे २१ लक्ष रुपये या कंपनीने केवळ विमानोड्डाणांच्या टाइम टेबलातील फुटकळ बदल जाहीर करण्यासाठी आणि एखाद दुसरा फडतूस नवा मार्ग जाहीर करण्यासाठी खर्च केले ! एकदा पैसे खर्चच करावयाचे ठरविल्यावर त्यासाठी एवढी फालतू कारणेसुद्धा पुरेशी होतातच !

या जाहिरातबाजीत 'समाजवादी खुशामतीचे' राजकीय प्रयोगही भरपूर दिसून येतात. ऐन आणीबाणीच्या पर्वात १९७५ साली चंदीगडला त्यावेळच्या

अखिल भारतीय कॉंग्रेस महासमितीचे अधिवेशन झाले. त्या प्रसंगी काढण्यात आलेल्या कॉंग्रेसी स्मरणिकेत काही सरकारी प्रकल्पांच्या जाहिराती होत्या. उदा. बोंगाइगांव रिफायनरी अँन्ड पेट्रो केमिकल्स लि. या उपक्रमाने कंपनीच्या खर्चाने कॉंग्रेसी स्मरणिकेत दहा हजार रुपयांची जाहिरात प्रसिद्ध केली होती. आणीबाणीच्या काळातील गैरव्यवहारांची चौकशी करण्याकरिता नेमलेल्या आयोगांच्या प्रसिद्ध झालेल्या अहवालांवरून स्पष्ट होते की आणीबाणीच्या काळात सरकारी उपक्रमांचे त्यावेळच्या सत्तारूढ कॉंग्रेस पक्षाशी जिव्हाळ्याचे संबंध होते. तसेच या उपक्रमांचे उच्च अधिकारी सत्तारूढ पक्षातील महत्त्वाच्या व्यक्तींच्या खुशामतीसाठी प्रयत्नशील होते. यातूनच मग अनेक प्रकारचे गैरव्यवहार दोघांच्याही संगनमताने घडून आले. सार्वजनिक औद्योगिक प्रकल्पांनी पक्षीय राजकारणाला खतपाणी घालणे देशाच्या दृष्टीने केव्हाही समर्थनीय ठरू शकत नाही !

खा. बसूनी उद्वेगाने निष्कर्ष काढला आहे— " The extraordinarily high expenditure on publicity by public sector undertakings inspite of their heavy accumulated losses–makes one very suspicious!"

आर्थिक व राजकीय भ्रष्टाचाराचे लोण आपल्या सार्वजनिक उपक्रमांत कोणत्या स्तरापर्यंत पोहचलेले आहे ह्याचे हे निष्कर्ष साक्षच देत आहेत !

### परदेशी दौरे व ओल्या पाटर्या

सार्वजनिक क्षेत्रांतील कारखान्यांच्या अधिकारी वर्गाचा परदेश दौऱ्यावरील खर्चही असाच भरमसाट असल्याचे बसू कमिटीला आढळून आलेले आहे. ८५ सार्वजनिक क्षेत्रीय कारखान्यांच्या-यातील २१ कारखाने सातत्याने तोटयात चालणारे आहेत.—अध्यक्ष, संचालक व वरिष्ठ अधिकारी वर्ग यांनी १९७६–७७ साली परदेशी प्रवास दौऱ्यावर सुमारे दोन कोटी रुपये खर्च केले. भरपूर चैन, मौजमजा आणि ' ओल्या पाटर्या ' यांवरही असाच वारेमाप खर्च केला जातो. उदा.–' मिनरल्स् अँन्ड मेटल ट्रेडिंग कार्पोरेशन 'ने भोजन पाटर्या व चैन यांवर ७६–७७ सालात सुमारे ३॥ लाख रुपये खर्च केले. याचा अर्थ दररोज १००० रुपयांचा चुराडा ! मुंबईच्या ' माझगाव डॉक 'चाही या प्रकारचा रोजचा खर्च एक हजार रुपये एवढा प्रचंड आहे. ' सेन्ट्रल इन्लॅन्ड ट्रान्स्पोर्ट कार्पोरेशन 'ला गेल्या काही वर्षांत २१·४३

कोटी रुपयांचा तोटा झाला. एवढ्या पैशांत देशात ७ कागद कारखाने नव्याने उभारता आले असते. परंन्तु हा वायफळ करमणुकीवरचा खर्च करण्यात ह्या महामंडळाला काही खंत वाटत असेल म्हणता ? या महामंडळाच्या एका पार्टीला सुमारे ४००० रुपये खर्च येतो. त्यातील एक हजार रुपये केवळ ‘ ड्रिंक्स् ’ वर खर्ची पडतात !

आपली सामाजिक जबाबदारी न ओळखता या कारखान्यांची कशी भरमसाट उधळपट्टी चालू असते हे वरील थोड्याशा उदाहरणांवरून दिसून येईल. आदरातिथ्याच्या नावाखाली अनेक बोगस बिले मंजूर करून घेतली जातात व नंबर २ चे अनेक व्यवहार पचनी पडतात. खा. बसूंनी यासंबंधी म्हटले आहे," Many of the public sectors undertakings are managed by disinterested, unscrupulous, inconsiderate mercenaries who are busy in fulfiling their own self interests rather than National interests."

उच्चभ्रू वर्गाच्या राष्ट्रीय दानतीच्या अभावाचे हे दिग्दर्शन मनाला चटका लावून जाते !

भारतातील मंत्र्यांप्रमाणेच ऊठसूठ परदेशी दौरे करण्याचे सर्रास प्रकार सार्वजनिक उपक्रमांमधील अधिकारी वर्गाचे चालत असतात. ह्यांतील काही दौरे निश्चितच आवश्यक असतात व तद्वारा उद्योग प्रकल्पांना बहुमोल परकीय तांत्रिक सहाय्य लाभत असते. तसेच भारताला विदेशांत प्रकल्प उभारून परकीय चलनही उपलब्ध होत असते. या दृष्टीने आदर्श व्यवहार ‘ हिंदुस्थान मशीन टूल्स, या सार्वजनिक उपक्रमांतील उद्योग समूहांचा आहे. तथापि इतर उपक्रमांची कामगिरी मात्र फारच चिंतनीय आहे. बसू समितीने असे दाखवून दिलेले आहे की प्रचंड तोटे चालू असतानाही प्रतिवर्षी परदेशी दौऱ्यांवरील या उपक्रमांचा खर्च वाढता आहे. १९७४–७५ मध्ये हा खर्च प्रतिप्रकल्प ०.७७ लाख होता तो १९७५–७६ मध्ये प्रतिप्रकल्प १.१२ लाख झाला तर १९७६–७७ मध्ये ही सरासरी २.३० लाखांवर पोहचली. ऐन आणीबाणीत अनुशासनपर्वाच्या नावाखाली ही सरासरी खूपच वाढली होती व आर्थिक शिस्त पार लयाला गेली होती. केवळ सेन्सॉरशिपमुळे ही प्रकरणें बाहेर येत नव्हती !

या परदेशी दौऱ्यांवरील अनुत्पादक व अनावश्यक खर्चाला ताळतंत्रच राहिलेला दिसत नाही. इंडियन एअर लाईन्सचे एक पंच ऑपरेटर आजारी पडले. त्यांचा आजार गरीब भारतातील डॉक्टर्स व हॉस्पिटल दुरुस्त करू शकले नाहीत असा 'गोलमाल' अहवाल तयार झाला तेव्हा या ऑपरेटर महाशयांनी 'आजार-दुरुस्ती' साठी कंपनी खर्चाने परदेशी प्रवास दौरा केला व पॅरिसला मुक्काम ठोकला. हे महाशय तेथून लवकर परतच येईनात ! तेव्हा त्यांच्यावर काही कारवाई करण्याऐवजी इंडियन एअर लाईन्सने त्या पंच-ऑपरेटरला परत भारतात आणण्यासाठी स्वतःचा एक मेडिकल ऑफीसर पॅरीसला रवाना केला. दोघांची गट्टी जमली. हे मेडिकल ऑफीसर व ते पंच ऑपरेटर दोघेही युरोपात फिरत राहिले. आता संचालकांनी ठरविले की या दोघांना आणण्यासाठी स्वतः पॅरिस गाठायचे. पण तेवढ्यात वरून आदेशवजा इशारा मिळतो आहे हे समजताच ही दुक्कल घाईघाईने आपले परदेश वास्तव्य आटोपून भारताला परतली !

'दिल्ली ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशन'चे जनरल मॅनेजर ब्रिटनमध्ये दौऱ्यावर गेले. त्यांनी तेथे भरपूर परकीय चलन खर्च केले. नंतर तेथून परतल्यावर त्यांना त्यांच्या परदेश-वारीचे प्रयोजन विचारल्यावर खूप विचार करूनही आपल्या परदेश-दौऱ्याचा हेतूच जनरल मॅनेजरना सांगता आला नाही ! हीच गोष्ट आयुर्विमा महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या परदेशी दौऱ्याबाबत आहे. मंडळाच्या अधिकाऱ्यांना वारंवार परदेशी का जावे लागते हे त्यांनादेखील नीटपणे सांगता आलेले नाही व बसू समितीपुढे त्या अधिकाऱ्यांनी थातुरमातुर उत्तरे पेश केली ! एवढेच नव्हे तर हा खर्च डोक्यावर येऊ नये म्हणून महामंडळाने विदेशी दौऱ्यांचा खर्च "air travel expenses incurred by central office" या ग्रुपखाली लपवून ठेवल्याचे बसू समितीला नंतर आढळून आले !

या अनावश्यक परदेशी दौऱ्यांमुळे देशाचे अमूल्य परकीय चलन बरबाद होते व त्यामुळे उद्योगधंद्यांना चलनाची तीव्र टंचाई जाणवत रहाते हा विचारही या उपक्रमांच्या अधिकाऱ्यांना मानवत नाही. खा. बसू लिहितात– "The scares foreign exchange that can be utilized for our core sector industries and technical knowhow is misused by public sector officials for undertaking 'pleasure trips' in the garb

of ' business tours ' abroad ! " यावर अधिक मल्लीनाथीची गरजच नाही.

## ज्यूट कॉर्पोरेशनचा भ्रष्टाचार

जी सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून हे सार्वजनिक प्रकल्प उभारले जातात त्या उद्दिष्टांची परिपूर्ती तर होत नाहीच उलट त्यांची पायमल्ली या उपक्रमांनी केलेली आढळून येते. याबाबत ' ज्यूट कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया ' या सरकारी मंडळाचे उदाहरण अत्यंत उद्बोधक तसेच लक्षावधी गरीब जनतेच्या दृष्टीने दु:खदायी असे आहे. ही सरकारी अर्थसंस्था केन्द्र सरकाने ४५ लक्ष गरीब ताग-शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण थांबावे व त्यांच्या अमूल्य अशा तागाला योग्य भाव मिळावा यासाठी स्थापन केली. तसेच तागाचे उत्पादन वाढवून तद्वारा अमूल्य असे परकीय चलन देशाला मिळवून अर्थव्यवस्था सुदृढ व्हावी हाही हेतू हे महामंडळ स्थापन करताना होता. पण प्रत्यक्षात काय घडले ? या कॉर्पोरेशनच्या अधिकारी वर्गाने व ज्यूटगिरण्यांच्या मालकवर्गाने संगनमत केले आणि या कॉर्पोरेशनद्वारा लाखो गरीब कास्तकऱ्यांस अक्षरश: लुबाडले. याबाबत केन्द्र सरकारने नेमलेली बसु कमिटी लिहिते,

" लक्षावधी दरिद्री शेतकऱ्यांना मध्यस्थ दलाल, मोठे व्यापारी व ज्यूटगिरणींचे श्रीमंत मालक यांच्या भीषण आर्थिक शोषणातून सोडविण्याचा ज्यूट कॉर्पोरेशन ऑफ इन्डियाचा उद्घोषित हेतू फक्त कागदावरच राहिला !" ज्यूट कॉर्पोरेशन महामंडळाच्या या अनिष्ट कारभाराला हातभार लावण्यात पुढाकार घेतला असेल तर तो केन्द्र सरकारच्या ' शेतमाल मूल्य आयोग ' मधील अधिकारीवर्गाने. अर्थखात्याने, व्यापार खात्याने आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे प्रत्यक्ष केन्द्रीय मंत्र्यांनीदेखील ! या सर्वांनी प्रचंड लाचखोरी करून भारताचा सुवर्ण-धागा (गोल्डन फायबर) म्हणजे ताग निर्माण करणाऱ्या कष्टकरी कास्तकऱ्यांना शोषणाच्या आर्थिक गर्तेत सरळ कलून दिलेले आहे ! "

' ज्यूट कार्पोरेशन ऑफ इन्डिया ' चे अधिकारी कच्च्या तागाची किंमत ठरविताना ज्यूट गिरण्यांच्या मालकांशी वाटाघाटी करतात. याबाबत गिरणीमालकांना भेटण्याची तशी काहीच गरज नसते कारण ज्यूटची किंमत ठरविताना शेतकऱ्याचा त्यावरील उत्पादनखर्च आणि साधारण १२ ५ टक्के त्यावर नफा मिळावा एव-

ढीच माफक अपेक्षा केन्द्र सरकारने या महामंडळाकडे व्यक्त केलेली असते. तथापि हे मंडळ ज्यूटगिरणींच्या मालकांना भेटावयास जाऊन गिरणीला ताग कोणत्या किंमतीत घेणे परवडेल ह्याची चौकशी करतात व त्यानुसार किंमती कमी ठरवू असे या गिरणीमालकांना आश्वासन देतात. याबाबत बसू समितीने कार्पोरेशनच्या अधिकाऱ्यांना खडसावून जाब विचारला असता ते अधिकारी गिरणीमालकांनाही तागाच्या किंमती परवडायला हव्यात ना? असे सरळ प्रतिपादन करताना दिसले ! त्यानंतर शेतकऱ्यांच्या उत्पादनखर्चाचे अंदाज महामंडळ कोणाकडून घेते असा प्रश्न निघाला असता महामंडळाने 'शेती-माल मूल्य आयोग' (Agricultural Prices Commission) या दुसऱ्या सरकारी संस्थेकडे बोट दाखवले. आता हे शेतीमाल मूल्य आयोग म्हणजे अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार यांचे आगरच असावे असे बसु समितीला आढळले. हा आयोग शेतकऱ्याचा खरा उत्पादनखर्च विचारातच घेत नाही व वाढत्या खताच्या बी-बियाण्यांच्या किंमतीचा विचारच करीत नसल्याचे आढळून आले ! त्यानंतर कृषिमालाच्या अंतिम किंमती ठरविण्यासाठी Economics and Statistics Directorate' या सरकारमान्य संस्थेची मदत घेतली जाते. ही संस्था तर व्यापारी व ज्यूटचे सटोडिये यांच्याच मदतीला धावून जाते असे आढळून आलेले आहे. बसू समितीने या सर्व संस्थांच्या संचालकांची सी. बी. आय तर्फे चौकशी करावी व ह्यांचे लक्षावधी गरीब शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण चालू ठेवण्याचे उद्योग थांबविले जावे अशी कडक शिफारस केन्द्र सरकारला केलेली आहे.

खा. बसूंचा निष्कर्ष असा आहे— "We feel that the jute corporation of India, the Agricultural Prices Commission, the Economics and statistics Directorate and even the Central Ministers assumed active role in protecting jute industry's interests and jute traders lobby at the cost of millions of poor and poverty-stricken farmars and in the process many palms are greased for 'substancial consideration ! "

राष्ट्राच्या सर्वोच्च स्थानांवर राष्ट्रीय दानतीचा केवढा मोठा अभाव आहे व त्यामुळे देश किती रसातळाला जाऊ शकतो त्याचे ही उदाहरणे म्हणजे डोळ्यांत पडणारे अंजनच आहे ! खा. बसूंनी अत्यंत मेहनतीने, प्रत्यक्ष पहाणीने आणखी एक अहवाल केन्द्र सरकारला सादर केला आहे. 'Economic offences

committed by Jute Trade and Jute Industry ' असे या अहवालाचे नाव आहे. हा अहवाल म्हणजे आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या ' Crisis of character ' चा काळाकुट्ट आलेख ! ज्यूट कार्पोरेशन ऑफ इन्डिया या सार्वजनिक कंपनीला देशाचे अमूल्य परकीय चलन देशालाच मिळावे तसेच सरकारचे एक्साइज्, इन्कमटॅक्स इ. कर सरकारी तिजोरीत नीटपणे भरले जावेत आणि तागाच्या निर्यात व्यापारास शिस्त लागावी इत्यादी कामांसाठी सर्वाधिकार देऊन नेमण्यात आले होते. परन्तु या कार्पोरेशनने, केन्द्र सरकारच्या ' एन्फोर्समेन्ट डायरेक्टोरेट ' या सर्वोच्च करविषयक मंडळातील भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या मदतीने व संगनमताने देशाची परकीय चलनाची व करांच्या पैशाची सरळ वाट लावली. खा. बसूंनी शेकडो उदाहरणे देऊन असे दाखवून दिलेले आहे की लाचखोरी करून कित्येक आर्थिक गुन्हेगार सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीने सहज सुटून जातात. परिणामी देशाचे प्रचंड आर्थिक नुकसान होते ! याबाबत एखादी केस पहाणे उद्‌बोधक ठरेल.

**आचार्यांचा घोटाळा !**

' आचार्य ब्रदर्स ' नावाची एक फर्म तागाचा निर्यात व्यापार करीत असे. या फर्मने परकीय चलनविषयक रिझर्व्ह बँकेच्या नियमांना व केन्द्र सरकारच्या नियमांना गुंडाळून ठेवून तागाचा पक्का माल निर्यात केला व १ कोटी रुपयांचे परकीय चलन बेकायदेशीररीत्या स्वतःच्या खात्यात जमा करून टाकले. या व्यवहारावर कुठलाही कर या कंपनीने भरला नाही. बसू समितीने याबाबत ज्यूट कार्पोरेशनच्या अधिकाऱ्यांना फैलावर घेतले तर त्यांनी अगदी थातुरमातुर उत्तरे दिली. त्यानंतर खा. बसूंनी केन्द्र सरकारच्या, आर्थिक गुन्ह्यांच्या तपासणीचे काम ज्यांच्याकडे दिलेले असते त्यांना बोलाविले.

' आचार्य ब्रदर्स ' या पार्टीने हा गुन्हा केल्यानंतर त्यांना बऱ्याच दिवसांनी Enforcement Directorate कडून शो-कॉज नोटीस देण्यात आली. त्यानंतर त्या फर्मवर दंड, व्याज इत्यादींची आकारणी करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याऐवजी सर्व सरकारी अधिकारी अगदी चिडीचूप बसुन राहिले ! ज्यूट कार्पोरेशन तर मुळी पळूनच गेली ! त्यानंतर या फर्मने कलकत्ता हायकोर्टात १९६८ मध्ये म्हणजे शो–कॉज नोटीसमधून मिळालेला एक वर्षाचा कालावधी

स्वस्थ घालवल्यावर स्टे–ऑर्डर मिळविण्याचा अर्ज करून तात्पुरता स्टेही मिळविला. हा स्टे उठविण्यासाठी एन्फोर्समेन्ट डायरेक्टर श्री. एस्. बी. जैन यांनी कुठलाही प्रयत्न केला नाही. त्यानंतर तब्बल चार वर्षांनी कलकत्ता हायकोर्टाने हा स्टे उठविला. दरम्यान या आचार्य ब्रदर्सचे प्रमुख भागीदार मरण पावले. त्यामुळे हे एक कोटी रुपयांचे परकीय चलन दंड, व्याज, शिक्षा इत्यादींसह कोणाकडून वसूल करावयाचे हा प्रश्न सरकारपुढे पडला ! नंतर या कुप्रसिद्ध फर्मचे इतर पार्टनर्स शोधण्यात आले. त्या इतर आचार्य बंधूंनी याबाबत कानावर हात ठेवले व ‘ आम्ही कुठलाच उद्योगधंदा करीत नसून या एक कोटी रुपयांच्या भानगडीची आम्हांला माहितीच नाही ’ असे निक्षून व दडपून सांगितले ! नंतर खा. बसूंनी श्री. जैन, डायरेक्टर ऑफ एन्फोर्समेन्ट यांना विचारले, “ आपण कोर्टाचा स्टे उठविण्यास काय काय कारवाई केली ? ” श्री. जैन महाशय काही बोलूच शकले नाहीत. नंतर खा. बसूंना डेप्युटी डायरेक्टर श्री. कौल यांनी बेलाशक खोटे सांगितले की ‘ आम्ही केन्द्र सरकारच्या सॉलिसिटरला हा स्टे उठविण्याबद्दल वारंवार सांगितले. ’ खा. बसूंनी लॉ सेक्रेटरी श्री. वेंकटसुब्बय्या यांना बोलाविले. त्यांनी रेकॉर्ड पाहून सांगितले की “ अशा प्रकारे स्टे उठविण्याची कायदेशीर कारवाई केन्द्र सरकारने त्वरित करावी असे श्री. जैन अगर श्री. कौल यांनी केव्हाही सरकारला कळवलेच नाही ! ते दोघे वरिष्ठ अधिकारी निखालस खोटे सांगत आहेत ! ”

यावर बसू समितीने या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रक असे अर्थखात्याचे सर्वोच्च अधिकारी यांना पाचारण केले. दरम्यान श्री. जैन व श्री. कौल यांनी अर्थखात्याकडे धावपळ केली. तेव्हा अर्थखात्याने खा. बसूंना सांगितले की बहुतेक श्री. जैन व श्री. कौल हे अधिकारी खोटे बोलत नसावेत. त्यांनी केन्द्र सरकारला ही कोटी-कोटीची भानगड अनेकदा तोंडी सांगितल्याचे कळते. शेवटी बसू समितीने यांचा लेखी पुरावा मागितला तेव्हा एक पत्र खूप शोधाशोधीनंतर गारुड्याच्या पोतडीतून बाहेर आले. पण हाय ! त्यावर तारीख होती ११-३-१९७७ आणि त्यात केन्द्र सरकारच्या सॉलिसिटरला ही भानगड कळविली होती व स्टे उठवावा आणि पुढील कारवाई करण्यासंबंधी मार्गदर्शन मागितले होते ! वारे सर्व अधिकारी वर्ग व त्यांचे प्रताप !!

अशा अनेक भानगडींमुळे भारतातल्या सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचीही दांनत उघडी पडते व सर्व देशाची अर्थव्यवस्था कशी पोखरून निघालेली आहे हे स्पष्ट

दिसून येते. वरिष्ठ पातळीवरचा कमालीचा भ्रष्टाचार, अर्थव्यवस्थेच्या हरेक क्षेत्रातील पोखरण, ' एकमेका सहाय्य करू अवघे करू मौजमजा ' अशा वृत्तीची पखरण याही गोष्टी उघड होतात. खाजगी क्षेत्रातील सटोडिये, दलाल इ. ची बिघडलेली दानतही स्पष्ट होते.

# कार्यक्षमतेचा बट्ट्याबोळ

खाजगी क्षेत्राची दानत ही देशाची एक मोठी डोकेदुखीच आहे. अमाप नफेबाजी आणि निकृष्ट प्रतीचा मालाचा दर्जा यामुळे भारतातील खाजगी क्षेत्रातील कारखानदारी-काही सन्मान्य अपवाद वगळता जगभर नाचक्की झाल्याने कुप्रसिद्ध आहे ! पण हे प्रकरण येथेच थांबत नाही. खाजगी क्षेत्र अनेकदा सार्वजनिक क्षेत्रीय कारखान्यांच्या पोटात शिरून प्रसंगी राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा बळी देऊन स्वत.ची पोळी पिकवून घेत असते. अर्थात याबाबत सरकारी प्रकल्पांचे भ्रष्ट अधिकारीही जबाबदार धरले जावेत. काही उदाहरणे पहाता येतील.

पुणे शहराच्या परिसरात महत्त्वाची औषधे बनविणारा 'हिन्दुस्थान ॲन्टी-बायोटिक्स्' हा सरकारी कारखाना आहे. एकेकाळी उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्राविण्य मिळविलेला हा कारखाना गेली काही वर्षे 'आजारी' आहे. पेनिसिलिन उत्पादनाचा हा कारखाना सुरू होऊन आता सुमारे २३ वर्षे झाली. सुरुवातीला तंत्रज्ञान परदेशातून आणले. पेनिसिलिनच्या उत्पादनास प्रारंभ झाला. त्यानंतर दहा वर्षांच्या काळात कंपनीने मक्तेदारी स्वरूपाचा धंदा करून भरपूर नफा मिळविला. तोच नफा उद्योगधंद्यांत गुंतवून 'स्ट्रेप्टोमायसिन' उत्पादनाचा कारखाना सरकारी आर्थिक मदतीशिवाय चालू केला. स्ट्रेप्टोमायसिनचे उत्पादनही प्रथम परदेशी तंत्रज्ञानाच्या मदतीने चालू केले. अशी ५-६ वर्षे गेली व नंतर कंपनीने परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबून न राहता नवीन औषध उत्पादनाच्या क्षेत्रात पाऊल टाकले. परन्तु त्यासाठी लागणारे संशोधन व पुरेशी तयारी न केल्यामुळे या आदर्शवत् वाटणाऱ्या कारखान्याची जी घसरगुंडी सुरू झाली ती आजतागायत! या घसरगुंडीची सुरुवात झाली ती 'व्हिटॅमिन सी' च्या उत्पादनाच्या निर्णया-पासून. सरकारी कारखान्यात असे महत्त्वाचे निर्णय घेण्यास फार काळ लागतो. त्याचेही खूप दुष्परिणाम होतात. 'व्हिटॅमिन सी' बनविण्याची प्रक्रिया पुणे येथील प्रसिद्ध 'नॅशनल केमिकल लॅबोरेटरी' यांची होती. प्लॅन्टचे डिझाइन कारखान्याच्या इंजिनिअरनी केले होते. या प्लॅन्टमधे सुमारे दोन कोटी रुपये गुंतवले गेले; परन्तु व्हिटॅमिन सीचे उत्पादनच होईना ! एकमेकांना दोष देण्याचा उद्योग गेली सात वर्षे चालू आहे; परन्तु १२५ टन उत्पादनक्षमता असलेल्या या कारखान्यात अजून उत्पादन

जवळ जवळ झालेलेच नाही ! या कारखान्यात व्हिटॅमिन 'सी' चा कारखाना उभा राहिला व लगेच 'हेमायसिन' हे औषध बनविण्यासाठी नव्या प्लॅन्टची उभारणी केली गेली. 'हेमायसिन' हे कारखान्याच्या अद्ययावत् संशोधन शाळेने शोधलेले Wonder Drug म्हणून त्याची खूप जाहिरात झाली होती. त्या संशोधन शाळेचे प्रमुख आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ होते. त्यांच्या या संशोधनाचा संशय घेण्याचे कुणाचे धाडस नव्हते. त्यामुळे 'हेमायसिन प्लॅन्टच्या निर्मितीसाठीही सुमारे दोन कोटी रुपयांचे भांडवल गुंतविले गेले होते. परन्तु प्रत्यक्षात हेमायसिनचे उत्पादन अजिबात झाले नाही. हा प्लँटही सध्या बंद आहे.

**बाह्य कंपनीची चलाखी**

व्हिटॅमिन 'सी'चे 'हिन्दुस्थान अॅन्टिबायोटिक्स् मधील उत्पादन बंद आहे परन्तु खाजगी क्षेत्रातील कारखानदारांनी ते लगेच जोरात सुरू केले. याबाबत खाजगी क्षेत्राची चालबाजी कारणीभूत झालेली आहे असा अनेक तज्ज्ञांचा अभिप्राय आहे ! हेमायसिन बाबतही बरेच संशयाचे वातावरण निर्माण झालेले आहेच. ही गोष्ट १९७७ मधील होती. व्हिटॅमिन सी आणि हेमायमिन हे प्रयोग बंद पडल्यावर 'हिन्दुस्थान अॅन्टीबायोटिक्स'ने 'अँपिसिलिन' उत्पादनाची योजना आखली. त्यासाठी 'वाइथ' या परकीय औषध कंपनीशी करार झाला. कराराप्रमाणे कारखान्याने उत्पन्न झालेल्या अँपिसिलिन पैकी ५० टक्के औषधे 'वाइथ' कंपनीलाच पुरविण्याचे ठरले. अँपिसिलिन उत्पादनासाठी लागणारे 6 APA नावाचे रासायनिक द्रव्य पिंपरीच्या कारखान्यात बनविण्याची योजना आहे; परन्तु सध्या तरी ते बाहेरून आणावे लागते व या खर्चास अग्रक्रमाने पैसे न पुरविल्यामुळे कच्च्या मालाचा पुरवठा होत नाही. यामुळे पाच टन क्षमतेचे लहान प्लँट महिन्यात जेमतेम आठवडाभरच चालते. सर्व यंत्रसामुग्री उभारून तयार असलेले ३० टन क्षमतेचे प्लॅन्ट तर महिन्यात एकच दिवस चालू शकते !

अँपिसिलिनचे करार परदेशी 'वाइथ' कंपनीशी आपल्या 'हिन्दुस्थान अॅन्टीबायोटिक्स्'ने केले त्यावेळी भारतीय कारखान्याचे जे मॅनेजिंग डायरेक्टर होते त्यांना लगेच सेवानिवृत्तीनंतर त्याच विदेशी 'वाइथ' कंपनीत मोठी नोकरी मिळावी हा नुसता 'योगायोग' मानणे कठीणच !

राष्ट्रीय हिताची पायमल्ली करून आणि सरकारी अधिकाऱ्यांना वश करून खाजगी क्षेत्र जी चालबाजी खेळते ती घृणास्पदच आहे ! सार्वजनिक क्षेत्र त्याला बळी पडते ही तर दुर्दैवाची बाब आहे.

निरनिराळ्या उत्पादनास लागणाऱ्या वस्तूंचा व कच्च्या मालाचा फार मोठा साठा सरकारी प्रकल्प अडकवून ठेवतात. दुर्मिळ असा औद्योगिक कच्चा माल आयात करण्याचे काम सरकारी पातळीवरच होत असल्याने असा कच्चा व मूलभूत माल सरकारी उद्योगांना केव्हाही उपलब्ध होऊ शकतो. मग त्यांनी अशा वस्तूंचा अवास्तव साठा का बाळगावा ? तीच गोष्ट देशात उपलब्ध असणाऱ्या पण टंचाई जाणवणाऱ्या सिमेन्ट, पोलाद यांसारख्या वस्तूंची. अशा वस्तूंचा अवास्तव साठा (stock inventories) ठेवण्याचे सरकारी प्रकल्पांचे धोरण अर्थव्यवस्थेला व या प्रकल्पांनाही हानिकारकच आहे. यामुळे प्रकल्पांचे भांडवल अडकून पडते व साऱ्या अर्थव्यवस्थेत टंचाई निर्माण होऊन भाववाढ व महागाई निर्माण होते. तसेच खाजगी क्षेत्रातील कारखान्यांना हा मूलभूत माल वेळीच उपलब्ध होऊ न शकल्यामुळे त्यांच्याही उत्पादनवाढीवर परिणाम घडून येतो. सरकारी मूल्यमापन अहवालानुसार (Evaluation Reports) या साठा केलेल्या वस्तूंची किंमत १९७६-७७ मध्ये सार्वजनिक प्रकल्पांकडे ३२६९ कोटी रुपये एवढी प्रचंड होती. याबाबतीत या प्रकल्पांच्या संचालकांनी आधुनिक व्यवस्थापनाचे शास्त्र अभ्यासून त्यानुसार सुधारणा घडवून आणणें अगत्याचे आहे, कारण हा साठा अवास्तव करण्याऐवजी Replacement Order of Inventories या शास्त्रानुसारच करावयास हवा.

मागेल तेवढे भांडवल केन्द्रीय अर्थखाते मंजूर करत असल्यामुळे अशा प्रकारे शास्त्रीय विचार व व्यवस्थापनाची कार्यक्षमता यांबाबत सार्वजनिक क्षेत्र उदासीन रहाते. परिणामी अमाप भांडवल अडकून पडते व अर्थव्यवस्थेचे खूपच नुकसान होते इतर देशांतील प्रगत कंपन्यां वरील प्रमाण इतके कमी ठेवतात की त्यांना खेळते भांडवल व आर्थिक उलाढाली Turn over यांचा सहज मेळ बसविता येतो. सार्वजनिक क्षेत्राने ह्याचा नीट अभ्यास केला पाहिजे.

### वाया जाणारी कार्यक्षमता

सार्वजनिक प्रकल्पांच्या निर्माण केलेल्या औद्योगिक क्षमतेचा पुरेपूर उपयोग न होणे हा मोठा रोग आपल्या देशाच्या या क्षेत्राला लागलेला आहे. हा प्रश्न खूपच जटिल असून तो औद्योगिक तसेच कृषि, सिंचन, वीजनिर्मिती इत्यादी क्षेत्रांतील अनेक सार्वजनिक उपक्रमांना डोकेदुखी ठरत आहे. मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून उत्पादन करण्याची क्षमता निर्माण करण्यात येते पण त्या ताकदीचा पुरेपूर

वापर मात्र केला जात नाही ही या प्रकल्प ची मोठीच त्रुटी आहे. नवी दिल्ली येथील ब्यूरो ऑफ पब्लिक एन्टरप्राइझेस मार्फत सरकारी प्रकल्पांच्या कार्याचा जो वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे त्यातील आकडेवारी चिंतनीय आहे. १९७३-७४ साली उत्पादन क्षमतेपैकी ५० टक्के किंवा कमी क्षमता वापरणाऱ्या प्रकल्पांची संख्या सार्वजनिक क्षेत्रांत २८% होती. १९७४-७५ साली ती कमी होण्या-ऐवजी वाढून ३६% एवढी जास्त झाली. भारतासारख्या भांडवल पुरवठा अत्यंत अल्प असलेल्या देशात भिलाई, दुर्गापूर व रूरकेला हे पोलाद कारखाने त्यांच्या उपलब्ध औद्योगिक क्षमतेपैकी केवळ ४० टक्के उत्पादनक्षमता वापरात आणू शकत आहेत. ही गंभीर बाब आहे. त्याचप्रमाणे १९७८-७९ च्या आर्थिक अहवा-लात हेही चिंता व्यक्त करून म्हटलेले आहे की भारतातील रासायनिक खत कारखाने केवळ ४८ टक्के एवढीच उत्पादनक्षमता वापरात आणीत आहेत! येथील साखर कारखाने जे केन्द्र व राज्य सरकारांच्या अखत्यारीत आहेत ते. केवळ १० ते ६० टक्के एवढीच उत्पादनक्षमता वापरू शकलेले आहेत. त्याचप्रमाणे सार्व-जनिक क्षेत्रातील अनेक प्रकल्प केवळ एकच शिफ्ट चालवू शकतात हीसुद्धा एक प्रकारची लपून राहिलेली उत्पादन क्षमताच आहे. तिचा पुरेपूर वापर होऊ शकलेला नाही कारण तीन शिफ्टमध्ये कारखाने चालले तरच तेवढ्याच गुंतविलेल्या भांडवलात तिप्पट उत्पादन व तिप्पट रोजगार उपलब्ध होऊ शकतो. (Disguised under-utilization of industrial capacity.) सार्वजनिक कारखाने आपले उत्पादन किती वेळ करतात, किती शिफ्टस् चालवतात व त्यांतील कर्मचारी ओव्हरटाईम व्यतिरिक्तच्या दैनंदिन कामकाजात किती उत्पादन करतात ह्याची आकडेवारी काढल्यास ती खूपच चिंताजनक ठरेल !

हीच परिस्थिती कृषी व सिंचन क्षेत्रात आहे. हिराकूड धरण आणि दामोदर व्हॅली धरण त्यांचे नियंत्रण करणारी जी सार्वजनिक कार्पोरेशन्स आहेत त्यांच्या अहवालानुसार या दोन्ही प्रचंड धरणांचे अवघे ६० टक्के पाणीच शेतकरी उपयोगात आणू शकले आहेत. कारण हे पाणी वापरणे सरकारी करांमुळे महाग पडत आहे तसेच अनेक ठिकाणी या कार्पोरेशन्सनी पाटच काढलेले नाहीत व त्यामुळे सिंचन-क्षमतेचा पुरेपूर उपयोग होऊ शकत नाही.

१९७८–७९ चा 'आर्थिक अहवाल' Economic Survey संसदेपुढे मांडण्यात आला त्यात असे स्पष्टपणे दाखवून देण्यात आलेले आहे की भारतात

भांडवल-गुंतवणूक आणि त्यातून होणारे उत्पादन यांचे प्रमाण Ratio 3:1 असे आहे. मुळात हे प्रमाणच इतर देशाच्या तुलनेने खूपच जास्त आहे. आणि दुर्दैवाची बाब म्हणजे हे प्रमाण सातत्याने वाढत आहे; म्हणजे भांडवल गुंतवणूक वाढूनही उत्पन्न व उत्पादन मात्र कमी कमी होत आहे. याचा अर्थ सार्वजनिक प्रकल्प नीटपणे संयोजन करू शकलेले नाहीत. तसेच त्यांचा उत्पादन क्षमतेचावापरही खूपच खाली घसरत आहे. त्यामुळे या प्रकल्पांचे आर्थिक तोटेही वाढते रहातात.

पोलाद, कागद, लोखंड, खते, औषधे, पाटबंधारे, पेट्रोकेमिकल्स् इत्यादी अत्यंत महत्त्वपूर्ण क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रम आपल्या औद्योगिक आणि कृषी उत्पादन क्षमतेचा अत्यंत असमाधानकारक असा वापर करीत आहेत. या परिस्थितीत त्वरेने आमूलाग्र परिवर्तन घडवून आणवून उद्योगीकरण, दारिद्र्यनिर्मूलन व बेकारी निवारण या तिन्ही भीषण समस्यांना तोंड देऊन यशस्वी होण्याचे उत्तरदायित्व सार्वजनिक क्षेत्रावर आहे. ते त्याने पार पाडलेच पाहिजे. परन्तु आज तरी या महान् कामासाठी लागणारे अथक परिश्रम, धाडसी निर्णय, सामाजिक जबाबदारीची पूरेपूर जाणीव आणि शास्त्रीय नियोजनाची विचारसरणी या सर्वांचा अभाव सार्वजनिक क्षेत्रात प्रकर्षाने जाणवत आहे !

# सार्वजनिक क्षेत्र कसे सुधारेल ?

नफा हा सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची कामगिरी ठरविण्याचा एकमेव मानदंड आहे असे कोणीही विचारी व्यक्ती म्हणणार नाही. अर्थव्यवस्थेच्या विकासाला अत्यावश्यक असलेल्या वस्तू जर कमी दराने कारखाना विकत असेल, दुर्बल घटकांची समाजातील क्रयशक्ती विचारात घेऊन किंमत नियंत्रण आणीत असेल तर त्या कारखान्याला होणारा तोटा काही प्रमाणात समर्थनीयही ठरू शकतो. उदा. हिन्दुस्थान ॲन्टीबायोटिक्स् लि. कारखान्याने पेनिसिलीन अगर तत्सम Life saving Drugs कमी किंमतीत विकली व तद्वारा समाजातील दुर्बल घटकांचे आरोग्य सुधारण्यात हातभार लावला व यामुळे समजा कारखान्यास तोटा सहन करावा लागला तर तो एकवेळ समर्थनीय ठरू शकेल. परन्तु अवास्तव खर्च, भोंगळ कारभार, उपलब्ध उत्पादनक्षमतेचा अपुरा वापर यामुळे होणारे तोटे कधीच समर्थनीय ठरू शकत नाहीत.

या दृष्टीने संसदेचे या सार्वजनिक उपक्रमावरील नियंत्रण हे अत्यंत कुचकामी ठरत आहे. संसदेचे नित्य बदलणारे स्वरूप आणि बदलणारे शासन यामुळे कुठल्याच निर्णयाची तड न लागता सार्वजनिक क्षेत्रावर नावापुरतेच नियंत्रण राहते. तेव्हा हे क्षेत्र ' संसदेला शेवटी जबाबदार राहील ' ह्या पद्धतीचा पुर्नविचार करण्याची भारतासारख्या अविकसित देशात गरज निर्माण झालेली आहे. लोकशाहीचे महागडे अलंकार केवळ शोभाच देणारे ठरत असतील तर त्यांचा पुर्नविचार केला गेलाच पाहिजे. तेव्हा संसदेचे नियंत्रण, पहाणी इत्यादी गोष्टी प्रभावी व व्यवहार्य ठरण्यासाठी उपाययोजना आखली पाहिजे.

त्याचप्रमाणे या क्षेत्राचा अगडबंब आकार आटोक्यात ठेवला गेला पाहिजे. त्यासाठी रशियाप्रणीत केन्द्रीभूत नियोजन व संचालन याऐवजी लहान लहान स्वायत्त कार्पोरेशन्स स्थापन करून त्यांच्याकडे व्यवस्थापनाची यंत्रणा दिली गेली पाहिजे.

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंदे सुधारावेत अशी राष्ट्रीय चारित्र्याची चाड बाळगणाऱ्या प्रत्येक भारतीयाची, मनापासूनची तीव्र इच्छा आहे. कारण हे प्रकल्प राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे आधारस्तंभ आहेत, तसेच भारतीय जनतेचे जीवनमान

सुधारण्यास अतिशय आवश्यक असे ते घटक आहेत. या कारखान्यांत वाघिणीपासून ते घडयाळापर्यंत आणि अणुशक्ती-पासून तर थेट न्याहारीच्या पावापर्यंत अनेक प्रकारचे उत्पादन होत आहे. या प्रकल्पांची आर्थिक वाढही सातत्याने होत आहे आणि देशाला स्वावलंबी बनविण्यास हे उद्योग हातभार लावीत आहेत.

### राष्ट्रीय कामगिरी

दुय्यम व अनुषंगिक औद्योगिक कारखान्यांना उत्तेजन देण्याचा कार्यक्रम या क्षेत्राने काही वर्षांपूर्वी हातात घेतला असून अशा दुय्यम उद्योगांची अर्थव्यवस्थेतील संख्या १३९ पासून ५०८ पर्यंत गेलेली आहे. १९७६-७७ मध्ये अशा अनुषंगिक कारखान्यांनी ४३८० कोटी रुपयांचा माल सार्वजनिक कारखान्यांना पुरविलेला आहे. हा एक चांगला विक्रमच म्हणावा लागेल.

देशाच्या एकूण निर्यात व्यापाराच्या वाढीत सार्वजनिक क्षेत्राचा बराच मोठा वाटा आहे. राष्ट्रीय निर्यात वाढीशी तुलना करता सार्वजनिक क्षेत्रातील निर्यात वाढीचे प्रमाण चांगले आहे. १९६८ ते १९७४ या काळात सार्वजनिक क्षेत्रातील निर्यात वाढीचे प्रमाणही आशादायक आहे; ही निर्यात या दरम्यान २७२ कोटी रुपयांवरून १११९ कोटी रुपयांपर्यंत वाढलेली आहे. १९७४-७५ मध्ये भारताच्या निर्यात वाढीत सार्वजनिक क्षेत्रातील निर्यातीचे प्रमाण ५३ टक्के होते. पोलाद, अवजड उद्योगधंदे, वाहतूक साधने आणि तांत्रिक व औद्योगिक सल्लासेवा ही या क्षेत्राची महत्त्वाची निर्यात क्षेत्रे होत.

त्याचप्रमाणे देशाचे संरक्षण आत्मनिर्भर तसेच प्रतिकारक्षम होण्यासाठी जे अनेक प्रकल्प या क्षेत्राने यशस्वी करून दाखविले तीही उल्लेखनीय कामगिरी ठरेल या क्षेत्राचा " वैजयंता " रणगाडा अनेक देशांना आदर्शवत् ठरला आहे.

पायाभूत व भारी उद्योगधंद्यांत सरकारने उत्पादक या नात्याने पाऊल टाकलेले आहे आणि ते योग्यच आहे. कारण या उत्पादनात भांडवल फार मोठ्या प्रमाणावर लागत असते व ते उत्पादन फलद्रूप होण्यास फार काळ लागत असतो त्यामुळे खाजगी उद्योगधंदे त्या उत्पादनाला हात घालण्यास फारसे तयार नसतात. काही मुद्द्यांवर वाद असू शकतो. उदा. लहान घडयाळे बनविण्याचा कारखाना सरकारने काढावा की नाही अगर गोडे तेल व साखर या वस्तू स्टेट ट्रेडिंग कार्पोरेशनने आयात करण्याचे अंगिकारावे की नाही? पण पोलाद, भारी

यंत्रे, भारी वीजसाहित्य, यंत्रचलित हत्यारे, यंत्र बनविण्याचे अवजड कारखाने, अणुशक्ती इंधन म्हणून बनविण्याचे प्रकल्प इत्यादींचे कारखाने–तसेच संरक्षण शस्त्रास्त्रांचे कारखाने हे सार्वजनिक क्षेत्रातच असावयास हवेत. म्हणूनच सार्वजनिक क्षेत्राची सर्वांगीण प्रगती व्हावयासच हवी

शास्त्रशुद्ध पायावरच उभारणी केल्याशिवाय सार्वजनिक क्षेत्राचा खऱ्या अर्थाने विकास होणार नाही. व्यवस्थापनाला अधिक व्यावसायिक स्वरूप देणे, उपलब्ध-साधनसामुग्रीचा अधिक चांगला वापर, कर्मचारी व यंत्रसामुग्री यांची अधिक, उत्पादनक्षमता आणि भांडवल गुंतवणुकीचे अधिक चांगले नियोजन या गोष्टी द्रुतनतीने करणे अगत्याचे ठरेल. त्याचप्रमाणे आपले आर्थिक तोटे महसुलांतून भरू काढण्यासाठी केन्द्र सरकारकडे किंमतवाढ मागत रहाण्याचा सोस सार्वजनिक क्षेत्राने सोडून दिला पाहिजे. हे तोटे शास्त्रीय नियोजन आणि अनुत्पादक खर्चावर नियंत्रण याद्वारे भरून काढले गेले पाहिजेत. किफायतशीरपणाचा विचार करता सामाजिक गरजा आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने उत्पादित मालांच्या किंमती यांचा मेळ घालावयास हवा. हा समतोल साधला गेला नाही तर बाजारपेठांचा नियंत्रक ही आपली भूमिका पार पाडणे सार्वजनिक क्षेत्राला कठीण जाईल.

**अशास्त्रीय नियोजन**

शास्त्रीय नियोजनाबाबतही सखोल, सर्वांगीण विचार या क्षेत्राबाबत होणे अगत्याचे आहे. काही उदाहरणे पहाता येतील. डॉ. एच्. एम्. हीली नावाच्या तज्ज्ञाने भारतातील काही सार्वजनिक क्षेत्रीय प्रकल्पांचा सांगोपांग अभ्यास करून याबाबत ग्रंथवजा निष्कर्ष प्रसिद्ध केलेले आहेत. रेल्वे ही सार्वजनिक क्षेत्राची एक फार मोठी शाखा आहे व देशाच्या ह्या वाहतूक–धमन्याच आहेत. डॉ. हीली यांनी भारतीय रेल्वेच्या परिस्थितीचा सालोसालचा अभ्यास केला. वॅगन टंचाई, इंजिन टंचाई रुळांची वाहतूकपात्रता, वाहतुकीची प्रादेशिक गरज व शक्यता इत्यादीमुळे जी अर्थ-व्यवस्थेची कोंडी होई तीसंबंधी डॉ. हीली यांचे म्हणणे असे की रेल्वेच्या भांडवल साहित्याची वाढ देशाच्या आर्थिक परिस्थितीच्या मानाने अवास्तव व भरपूर प्रमाणात होऊनसुद्धा निरनिराळ्या विभागांत भांडवलाची वाटणी नीट शास्त्रोय पणे झाली नाही. त्यामुळे भारतीय रेल्वेच्या व अर्थव्यवस्थेच्या अडचणी खूपच वाढल्या. १९५१–६० या काळात भारतीय रेल्वेतील भांडवल गुंतणक व फलप्राप्ती

यांचे प्रमाण (Capital : Output Ratio) ६.४९–१ असे पडले. रशिया व अमेरिका या देशातही उद्योगिकरणाच्या आरंभकाळी (ज्या वेळी या देशाजवळ भरपूर भांडवल उपलब्ध होते त्या वेळीही) हेच प्रमाण २ : १ असे होते. भारतात हे प्रमाण इतके जास्ती का ? डॉ. हीली यांच्या मते भारतीय रेल्वेमध्ये भांडवलाची वाटणी अव्यवस्थित व कार्यक्षमता कमी यामुळे या क्षेत्रात भांडवल खूप असूनही फलप्राप्ती कमी झाली.

हीच गोष्ट इतर अनेक क्षेत्रांत दिसून येते. या क्षेत्राचे कृषि-प्रकल्पही त्याची साक्ष देतात. त्यामुळे सर्वत्र शास्त्रीय नियोजनाचा संकल्प हवाच. सिंचन (Irrigation) सोयींची निर्मिती ही तर उतरत्या पैदाशीची भांडवलगुंतवणूक आहे हे प्रथमच लक्षात घ्यावे लागते. पुढल्या पुढल्या कामांत पाणी अधिकाधिक दुर्मिळ होत जाते, बांध-कामाचे व इतर साहित्य महागत जाते. यामुळे तेवढेच पाणी उपलब्ध करण्यासाठी पुढल्या पुढल्या योजनांतून उत्तरोत्तर खर्च वाढत जातो. यामुळे दरएकरी सिंचन खर्च महागत जातो. याचा परिणाम काय होतो ? डॉ. हीली लिहतात– " सिंचनात येणारा तोटा सरकार सर्वसामान्य करांतून भरून काढते. भारत सरकारने हा धोपट मार्ग शास्त्रीय दृष्टिकोनाच्या अभावातून अवलंबिलेला दिसतो. त्यामुळे सरकारी पद्धतीच्या नियमानुसार गरिबांवर कर बसवून त्यांचा पैसा श्रीमंत शेतकऱ्यांच्या वैभववाढीवर खर्ची झालेला भारतात दिसतो. पाणी-वाटपाच्या दरात कोणत्याही कारणाने फरक होत नसल्याने श्रीमंत शेतकऱ्यांना हे फायदेशीर ठरते. या धोरणाचे शास्त्रीय नियोजनाच्या आधुनिक विचारातून केव्हाही समर्थन करता येणार नाही. " म्हणजेच नियोजनाबाबतच्या प्रचलित ढोबळ कल्पना दूर केल्या पाहिजेत. तसेच अग्रक्रमांची पुनर्आखणी करून तद्वारा देशातील आर्थिक विषमता कमी केली पाहिजे. धनसत्तेचे केन्द्रीकरण मूठभर श्रीमंतांच्या हातात सरकारी प्रकल्पांच्या फलप्राप्ती द्वारा होणे केव्हाही योग्य नाही !

विजेचा दर प्रत्येक युनिटला जो आहे त्याने वीजनिर्मितीवर सार्वजनिक क्षेत्राचा भांडवली खर्च भरून निघत नाही. ज्यांना यंत्रचालन शक्ती पुरवली जाते त्यांच्याकडून शक्तीपुरवठ्याची किंमत घेतली जात नाही व मग येणारा तोटा सामान्य जनतेवरचे वीजभाडे वाढवून त्यातून कमी केला जातो. वीजशक्तीतील ६२ टक्के वीज उद्योगधंद्यावर वापरली जाते व त्यांना सर्वसामान्य भारतीय जनतेच्या करांमधून वीज किंमतीवर सूट दिली जाते. डॉ. हीली म्हणतात त्याप्रमाणे हेही

अशास्त्रीय विचारसरणीचेच द्योतक आहे. अन्तर्गत भांडवल उभारणी आणि आर्थिक प्रगतीची सुयोग्य वितरणपद्धती या गोष्टी सार्वजनिक प्रकल्पांनी संचालनाद्वारे साधल्या पाहिजेत.

**प्रचंड कल्पनांचा हव्यास**

सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार करताना भांडवलप्रधान विचारसरणीचा नियोजनकारांवर व प्रकल्पांच्या संचालकांवर पगडा बसलेला दिसतो. पं. नेहरूंच्या काळात उत्तुंग उभारणी, पाश्चात्यांची बडया उद्योगांची कल्पना, प्रचंड यंत्रसामुग्री आणि भांडवली योजना यांची खूपच चलती होती. याबाबत काही कल्पना निश्चितच अत्यावश्यक होत्या; परन्तु या सर्व खटाटोपात भारताचे खरे आर्थिक प्रश्न, वाढती श्रमिकांची संख्या, प्रचंड पसरलेला ग्रामीण समाज या सर्वांची उपेक्षा झाल्याने सार्वजनिक क्षेत्राची प्रगती एकांकी झाली व विकास कुंठित झाला.

मानवी श्रम ज्यात विशेष लागतात अशी ग्रामीण कामे उपेक्षिली गेल्यामुळेही सार्वजनिक उद्योगांचे खूपच नुकसान झालेले आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेचा अपवाद वगळता या ग्रामीण अनुषंगिक कामांकडे खूपच दुर्लक्ष झाले. मोठ्या सिंचन योजनेखाली पुरेशी जमीन बागायती होऊ शकली नाही याचे कारण कालव्यांचे पाणी शेतात पोहचविणारे पाट मानवी श्रमांनी करावयाचे असतात व ते केले जात नाहीत. अवाढव्य योजनांची फलनिष्पत्ती लहानशा चुकीमुळे किती अल्प प्रमाणात होऊ शकते हे यावरून दिसून येईल.

दामोदर व्हॅली कार्पोरेशनसारख्या प्रचंड बांधकामावर यांत्रिक साधनांऐवजी जेथे मानवी श्रम वापरता येतील तेथे मानवी श्रम वापरणे हेच अन्ती काटकसरीचे ठरते. दामोदर व्हॅलीच्या कामावर १० वर्षांत यांत्रिक साधने दरसाल २००० तास वापरली जावयाची असता निम्म्याहून कमी तास वापरली गेली व ती निकामी पडून राहून भारी किंमतीच्या भांडवलाचे नुकसान झाले. म्हणून जेथे माणसे परवडतील तेथे रोजगारी वाढविण्यासाठी, तसेच भांडवलाची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी यंत्र टाकून देऊन मानवी श्रमच उपयोगात आणले गेले पाहिजेत. सार्वजनिक क्षेत्राचा ढाचा पाश्चात्य यंत्रप्रधान संकृती आणि रशियाप्रणीत केन्द्रीभूत संचालन पद्धती यांमध्ये अडकून पडला आहे. या ढाच्याचे भारतीयकरण होणे नितांत आवश्यक आहे.

भारतात उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा

निश्चितच आपणाला असा निष्कर्ष काढावा लागतो की आपली उत्पादनपद्धती ही '**श्रमप्रधान**' असावयास हवी. आपल्यापाशी एक तर भांडवलाची कमतरता आहेच, आणि जे काही थोडेफार भांडवल गोळा करू शकतो, त्याचे रूपांतर जेव्हा मानवी श्रम वाचविण्यासाठी आम्ही स्थिर भांडवलात म्हणजेच यंत्रसामुग्रीत करतो तेव्हा ते परदेशात पाठवावे लागते. आपल्याला त्याचा वास्तविक उपयोग होत नाही. या व्यतिरिक्त आपली जुनी अवजारे व यंत्रसामुग्री बेकार होते ते निराळेच. या सर्वांचा परिणाम भांडवलाच्या नाशात होतो व बेकारीत आणि दारिद्र्यात वेगाने भर पडत जाते. याबाबत मौलिक विचारवंत, प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ पंडित दीनदयाल उपाध्याय लिहितात– " अतिशय गुंतागुंत असलेल्या पाश्चात्य पद्धतीच्या उत्पादनतंत्रामुळे थोड्याफार जणांना अवश्य रोजगार मिळतो व उत्पादनवाढ दिसू लागते, तथापि यामुळे देशातील संपूर्ण अर्थव्यवस्थेत कायम स्वरूपाचा आणि क्रान्तिकारी बदल करणारा प्रवाह निर्माण होऊ शकत नाही. "

## श्रमप्रधान पुनर्उभारणी हवी

हा अत्यंत महत्वाचा विषय ठरतो. सार्वजनिक क्षेत्राची उभारणी मुख्यतः भांडवलप्रधान पाश्चात्य पद्धतीने विकसित झालेली आहे व त्यातील गुणदोष भांडवलशाही व रशियाप्रणीत समाजवाद यांतून निर्माण झालेले आहेत. परन्तु भारताचे आर्थिक प्रश्न भिन्न आहेत व त्यादृष्टीने या क्षेत्राचा विकास व वाटचाल व्हावयास हवी. उदा. रासायनिक खत कारखाने हे आपल्या देशात मुबलक असणाऱ्या कोळशाच्या इंधनावरच उभे राहिले पाहिजेत. भिलाई, दुर्गापूर व रुरकेला हे तीन पोलाद कारखाने त्यांची उत्पादनक्षमता निम्मीदेखील वापरीत नसताना नवा बोकारो पोलाद कारखाना उभा करण्यापूर्वी शंभर वेळा विचार केला पाहिजे. लक्षावधी लोक बेकार असताना यंत्रसामुग्री अत्यावश्यक असेल तेथेच यावयास हवी बाकी ठिकाणी मानवी श्रमच उपयोगात आणले गेले पाहिजेत. कोट्यवधी भारतीयांची खरेदीशक्ती अगदीच तुटपुंजी असताना सार्वजनिक प्रकल्पांनी अशोक हॉटेल, इलेक्ट्रॉनिक्स् गणकयंत्रे, रंगीत टी. व्ही. असे प्रोजेक्ट हातात घ्यावयास नकोत. भारताची ७० टक्के जनता खेडेगावांत रहात असताना ग्रामीण रोजगार व ग्रामीण उद्योगधंदे यांना चालना मिळून अर्थव्यवस्था सुदृढ पायावर उभी करण्यासाठी या क्षेत्राने कार्यान्वित

व्हावयास हवे आहे. उदा. या क्षेत्रातील कापडगिरण्यांनी टेरिलिन, टेरिवुलन बनविण्याऐवजी साधे सुती कापड स्वस्त दरात उपलब्ध करून दिले पाहिजे. थोडक्यात, सार्वजनिक क्षेत्राचे 'भारतीयकरण होऊन विकेन्द्रित, श्रमप्रधान, कृषक भारताला न्याय देणारी पुनर्मांडणी आवश्यक आहे. त्यांतूनच या क्षेत्राचे उत्पादनक्षमतेचा पुरेसा वापर इ. प्रश्न सुटू शकतात.'

समाजवादातील सार्वजनिक क्षेत्राविरुद्ध जोरदारपणे मांडला जाणारा आक्षेप कार्यक्षमतेबाबतचा आहे. तांत्रिक कार्यक्षमता टिकवून धरण्यासाठी नफ्याच्या स्वरूपाचा मोबदला आवश्यक असतो. असा मोबदला ज्या अर्थसंघटनेत नसतो, तेथील उत्पादनक्षमता तसेच उत्पादनक्षमतेचा वापर घटल्यावाचून रहात नाही. या प्रश्नांबाबत आता नवीन विचारधारा जगात निर्माण होऊ लागलेली आहे. तिची दखल घ्यावी लागेल.

सारख्याच परिस्थितीतील दोन उद्योगधंदे — एक खाजगी क्षेत्रातील व दुसरा सार्वजनिक क्षेत्रातील घेतले तर खाजगी क्षेत्रातील उद्योगधंद्यामध्ये तसेच संयुक्त भांडवली मंडळामध्ये (Ltd. Cos.) कार्यक्षमता जास्त आढळते. कारण तेथे अकार्यक्षमतेचा उघड परिणाम दिवाळखोरीमध्ये अगर धंदा बुडण्यात होतो. समाजवादातील उद्योगसंस्थांचे (सहकारी सोसायटचा सोडून) म्हणजेच सार्वजनिक क्षेत्रीय उपक्रमांचे अशा परिणामापासून संरक्षण केले जाते. लॉर्ड मॅलचेट यांनी त्यांच्या 'इन्डस्ट्री ॲन्ड पॉलिटिक्स्' या ग्रंथात लिहिले आहे : "खाजगी उद्योगावर उभी असलेली भांडवलशाही यशस्वी का होते आहे ? ही गोष्ट तुम्हांला मी स्पष्ट करून सांगतो. जर भांडवलशाहीतील खाजगी उद्योगव्यवसाय अकार्यक्षमतेने चालविण्यात आला तर त्याचे दिवाळे वाजते व पुढील सर्व गोष्टी कोर्टाकडे, सोपविल्या जातात. या सर्वांचा अर्थ काय ? तो असा आहे की कार्यक्षमतेवर नियंत्रण ठेवणारी किंवा विशिष्ट कार्यक्षमतेची खात्री देणारी स्वयंचलित अदृश्य यंत्रणाच खाजगी क्षेत्रात आढळून येते. या अदृश्य यंत्रणेच्या नियंत्रक घटकांद्वार कार्यक्षमतेला आपोआप बक्षीस बहाल केले जाते. ही यंत्रणा ओबडधोबड किंवा त्रासदायक वाटण्याचा संभव आहे. पण अकार्यक्षम व्यवस्थापनाला योग्य ते शासन किंवा शिक्षा करण्याची हीच एकमेव पद्धती जगात आजवर प्रभावी रीत्या काम करणारी अशी आढळून आलेली आहे."

## बरखास्तीचा चाप हवा

हा विचार फारच परखड आहे परन्तु विचार करावयास लावणारा आहे. सार्वजनिक क्षेत्रीय कारखान्यांना खाजगी क्षेत्राप्रमाणे दिवाळखोरी अगर बंद होण्याची भीती नसल्यामुळे व त्यांचे तोटे सालोसाल सरकारी महसुलातून भरून निघत असल्याने या क्षेत्राचा उधळपट्टीचा, अनुत्पादक खर्चाचा मनमानी कारभार चाललेला असतो. तेव्हा हे ' समाजवादी संरक्षण ' विचारान्ती तापदायकच ठरलेले आहे असे दिसून येईल. कार्यक्षमता, काटकसर आणि कुशलता वाढविण्यासाठी या सार्वजनिक क्षेत्रावरील संसदीय अंकुश पक्का केला तर पाहिजेच परन्तु या क्षेत्राला आर्थिक शिस्तही लावली पाहिजे. ही शिस्त त्याच वेळी निर्माण होऊ शकते, जेव्हा या क्षेत्राला त्याच्या उधळपट्टीचे व अकार्यक्षमतेचे शासन होऊ शकेल. त्या दृष्टीने आता नवा विचार पुढे येऊ लागला आहे व त्याचा भारतातही स्वीकार व्हावा हा विचार म्हणजे जर सार्वजनिक प्रकल्प सातत्याने तोट्यात जाऊ लागले, त्यांची कार्यक्षमता सतत घसरत राहिली, उत्पादन अपेक्षेपेक्षा खूपच कमी होऊ लागले तर असे प्रकल्प सरकारने खाजगी क्षेत्राला चालवावयास द्यावयाचे व खाजगी क्षेत्राने स्वत:चे संचालक यावर नेमून कारभार पहावयाचा. त्याहीपुढे जाऊन असा गंभीर आजारी प्रकल्प सरकारने सरळ Open Auction मध्ये इतरांवर संचालनासाठी सोपवावयाचा ! ही टांगती तलवार ठेवल्याशिवाय हे क्षेत्र सुधारू शकणार नाही खाजगी आजारी कारखान्याचे नियम या सरकारी प्रकल्पांनाही लागू करून कार्यक्षमता, उत्पादनक्षमता यांची वाढ करून अर्थव्यवस्थेला आधार दिला पाहिजे.

उद्योगधंद्यांच्या स्वरूपाशी आणि त्या उद्योगधंद्यामध्ये होत असलेल्या उत्पादनाच्य प्रमाणाशी व्यवस्था आणि संघटन यांचा खूप निकटचा संभव असतो. एखादी वस्तू निर्माण करण्यातील कौशल्य हा जरी व्यक्तिगत गुण असला आणि त्यासंबंधी कुठलाही व्यापक नियम करता येण्याची शक्यता नसली; तरीसुद्धा कौशल्याच्या बाबतीत सर्वसाधारण मर्यादा निश्चित करता येतात. सार्वजनिक क्षेत्रातील मोठमोठ्या उद्योगधंद्यांच्या व्यवस्थापनासाठी आणि अंगभूत संघटनेसाठी ज्या कौशल्याची आवश्यकता लागते, ते कौशल्य असलेल्या व्यक्ती दुर्मिळ आहेत व त्यासाठी लागणारे प्रशिक्षण आणि राष्ट्रीय मनोवृत्तीही येथे त्याहूनही दुर्मिळ आहे. भारतात चालू असलेल्या बहुसंख्य उद्योगधंद्यांमध्ये योग्य त्या व्यवस्थापकांचा व सामाजिक जबाबदारीची जाण असलेल्या उद्योजकांचा अभाव अगदी तीव्रपणे जाणवतो.

पं. दीनदयालजी लिहितात " आधुनिक गुंतागुंतीच्या अर्थव्यवस्थेतील उद्योगधंद्यांच्या व्यवस्थेसाठी उच्च शिक्षण, परिश्रम, कल्पकता, अष्टावधानता आणि बुद्धिमत्ता इत्यादी गुणांची अत्यंत आवश्यकता असते, ह्या आवश्यक गुणांचा विकास करून अगदी परिपूर्ण आणि योग्य त्या व्यवस्थापक, वर्गाच्या निर्मितीसाठी कालावधी व प्रशिक्षण यांना अग्रक्रम दिला पाहिजे. " (भारतीय अर्थनीति-विकासाची एक दिशा)

## आधुनिक व्यवस्थापन

व्यवस्थापन हे आधुनिक युगाचे प्रगल्भ शास्त्र होऊन बसले आहे. तेव्हा व्यवस्थापनाच्या शास्त्रीय बाजू मजबूत करण्यासाठी मॅनेजमेन्ट कॅडर निर्माण करून संचालन व्हावयास हवे. तसेच या क्षेत्रातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष राजकीय हस्तक्षेप थांबविला गेला पाहिजे. तद्वत् हे प्रकल्प संसदेच्या नियंत्रणाखाली नीटपण रहाण्यासाठी संसदेच्या नियंत्रण-समितीची जरब बसली गेली पाहिजे. आज संसदेचे नियंत्रण हा पोरखेळ होऊन बसला आहे. संसदेच्या अहवालांना संचालकवर्ग केराच्या टोपलीत फेकून देत असल्याचे दृश्य दिसत आहे. हे बदलले पाहिजे. नोकर वर्गात भरती व बढती याबाबतचे नियम पक्के केले गेले पाहिजेत. नोकरीतील अनुक्रमापेक्षा कर्तृत्वशक्तीला अधिक महत्त्व प्राप्त करून दिले पाहिजे. तसेच पूर्वीच्या ब्रिटिश पद्धतीचे अनुशासन बदलून तांत्रिक विषयाचे इंजिनिअर व शास्त्रज्ञ यांना आय्. ए. एस् मधील सनदी अधिकाऱ्यांपेक्षा अधिक महत्त्वाचे ठरवून त्या सल्लागारांना संचालक पदावर नेमले गेले पाहिजे. या तंत्रज्ञानी अर्थशास्त्रीय विचारांचा मागोवा घेत राहून कारखान्यांची निर्माण केलेली औद्योगिक क्षमता पुरेपूर कशी वापरात आणली जाईल इकडे बारकाईने लक्ष पुरविले पाहिजे. समाजवादाच्या नावाखाली मनमानी वागणारा जो बेजबाबदार असा सरकारी कर्मचाऱ्यांचा व अधिकाऱ्यांचा, अर्थतज्ञ प्रा॰ जिलास म्हणतात असा, New Class निर्माण झाला आहे त्याला वेळीच वचक. बसवून ताळ्यावर आणले गेले पाहिजे. Where wealth accumulates and pmen decay असा अर्थतज्ञ प्रा. गॅलब्रेथ यांनी वर्णन केलेला प्रकार जो वरिष्ठ .तळीवर चालू आहे तो थांबविला गेला पाहिजे. Public Sector is Nobody's sector अशी सध्याची कर्मचाऱ्यांची मनोवृत्ती आमूलाग्र बदलवन सामाजिक जबाबदारीची जाणीव असणारे राष्ट्रीय दानतीचे शिल्पकार संचालन व कार्यभार करू लागले पाहिजेत.

भारतासारख्या गरीब शेतकरी कामकरी देशाचे प्रश्न समाजवादी कल्पनांमधूनही सुटू शकत नाहीत. अगर भांडवलशाही उद्योगीकरणातूनही सुटू शकत नाहीत. हे जटिल आर्थिक प्रश्न–देशात ध्येयवादी, नेकीची आणि अभ्यासु माणसे संचालन करणारी असावी लागतात– कर्मचारी व अधिकारी, परिश्रमाला आराध्य दैवत समजणारी असावी लागतात– उद्योजक हे औद्योगिक संस्कृती व राष्ट्रीय दानत असलेले असेच असावे लागतात– त्याच वेळी सुटू शकतात. श्रमाची प्रतिष्ठा जपणारे आदर्श निर्माण करावे लागतात तेव्हा उद्योगीकरण पुढे सरकू लागते.

अशा प्रकारची विज्ञानाची कास धरणारी औद्योगिक नीती, शास्त्रीय नियोजनाची वाटचाल करणारी अर्थनीती, राष्ट्राचे हित जपणारी कळकळीची उद्योजक संस्कृती आणि श्रमाची प्रतिष्ठा व आराधना राखणारी उत्पादक पद्धती या सर्वांचा अंगीकार केल्याशिवाय सार्वजनिक क्षेत्राचा ताळेबंद सुधारू शकणार नाही.

सार्वजनिक क्षेत्राने उद्योगीकरण करताना भारताचे खास आर्थिक प्रश्न विचारात घेऊन आगेकूच केली पाहिजे. येथे मानवी श्रम भरपूर उपलब्ध आहेत पण भांडवलाची टंचाई आहे; दारिद्र्यरेषेखाली कोट्यवधी जनता जीवन कसेबसे रेटीत आहे तर कारखान्यांची उत्पादनक्षमता भरपूर प्रमाणात पडून आहे; जीवनावश्यक वस्तूंची खरेदीच होऊ शकत नाही कारण लाखो लोकांजवळ खरेदीशक्तीच उरलेली नाही. ही परिस्थिती आव्हानात्मक आहे. यासाठी कृषिऔद्योगिक श्रमप्रधान अर्थ-व्यवस्था निर्माण व्हावयास हवी व ग्रामीण उद्योगीकरणाला चालना मिळेल असे सार्वजनिक क्षेत्रातील प्रकल्पांचे स्वरूप व नियोजन व्हावयास हवे. प्राश्चात्यांची यंत्रप्रधान, उत्तुंग, भपका असलेली औद्योगिक नीती आणि रशियाप्रणीत केन्द्रीभूत साचेबंद संचालक पद्धती यांच्या ढाच्यातून भारताचे सार्वजनिक क्षेत्र मुक्त करावयास हवे. त्यास मानवी श्रमांची सांगड मानवी प्रतिष्ठेशी घालणारी भारतीय अर्थनीतीची जोड द्यावयास हवी. सामाजिक जबाबदारी मानणारी व आपल्या रंजल्या गांजल्या, दारिद्याने पिळलेल्या बंधूंची आठवण ठेवून भारतीय जनतेच्या घामाच्या, श्रमाच्या भांडवलाची जाण ठेवणारी व्यवस्थापकांची पिढीच्या पिढी उभी करावी लागेल. त्यासाठी देशाचे उद्योगीकरण, उद्योगांचे श्रमीकरण आणि श्रमिकांचे राष्ट्रीयकरण ही त्रिसूत्री मार्गदर्शक प्रेरणा म्हणून ठाकली पाहिजे. आपल्या भारतभूमीचे प्रश्न वेगळे आहेत हे ध्यानात घेऊन स्वयंभू मार्गक्रमणा पत्करली पाहिजे व आपला रस्ता आपणच शोधला पाहिजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0023082

विराट प्रकाशनाला
आमच्या शुभेच्छा

**ideal road builders private limited**

*Office :* 510, Commerce House,
140, Medows Street,
Fort, Bombay – 400 023.
Phone : 273447 - 48

*Site :* Asphalt Plant, Chandivali Farm,
Chandivali Village,
Bombay – 400 072.
Phone : 58 50 50